म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा..वा..
दा. क्र. : १९८२

BVBK-0401982

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय
दा. क्र.
२२

वाचनालय वा.वा

१९८२

१९८२
८।५

वाचनालय वा वा

१९८३
८।५।८६

वाचनालय वा.वा

वाचनालय वा वा

१९८३
८।५।८६

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

दा. क्र. १९८२ दिनांक ८।५।८६

विषय वा.वा.

BVBK-0401982

BVBK-0401982

नवे अंकुर : नवी पालवी

या योजनेतील पुस्तक

# उत्सव व सण

प्र. न. जोशी

प्रसाद प्रकाशन, पुणे ३०

# १) मानवी मनाचे अन्न

## उत्सवांतील, सणांतील आनंद

आपणांस उत्सवांत, सणांत केवढा आनंद वाटतो. सर्वत्र उत्साह असतो. आनंद असतो. रोजच्या चिंता आपण विसरतो. दैनंदिन कटकटी, द्वेषभाव, मतभेद विसरून आपण सर्व माणसे उत्सवाच्या निमित्ताने, सणाच्या निमित्ताने एकत्र येतो. हसतो, नाचतो, बागडतो. गणपतीच्या उत्सवात केवढा संतोष असतो. सार्वजनिक गणेशोत्सव तर आता मोठ्या हौसेने, उत्साहाने आपण साजरा करतो. विजयादशमी म्हणजे दसरा, दिवाळी यांची तर लहान-थोर वाट पाहात असतात.महाशिवरात्र, होळी, संक्रांत यांसारख्या सणांचे आकर्षण सर्वांनाच असते. शाळांना सुट्टी मिळते. नवीन कपडे घालायला मिळतात. वाजंत्री, मनोरंजन, प्रेक्षणीय दारूकाम, गोड पदार्थांचे सेवन, पाहुण्यांची, इष्टमित्रांची भेट; यांच्या नादात आपण क्षणभराची दुःखे विसरून जातो. आधीच धावपळीचे, गुंतागुंतीचे, स्पर्धेचे बनलेले आपले जीवन उत्सव व सण यांनी सुसह्य बनते. तप्त जीवनास गारवा, सुखद निवारा मिळतो. साधुपुरुषांच्या जन्मतिथी, पुण्यतिथी, पंधरा ऑगस्ट, सव्वीस जानेवारी, एक ऑगस्ट, दोन ऑक्टोबर यांसारखे दिवस म्हणजे आपण राष्ट्रीय सणा-

सारखे पाळतो. जुन्या चुका सुधारण्यात, नवीन प्रगतीची दिशा आखण्यासाठी, म्हणून नवीन संकल्पही करतो.

## संसारग्रस्त मनुष्यास समाधान

उत्सव व सण यांची परंपरा प्राचीन काळापासूनची आहे. काही उत्सवांत वा सणांत आपल्या प्राचीन पूर्वजांनी केलेल्या पराक्रमांची, अद्‌भुत शौर्याची स्मृती असते. उत्सव व सण यांनी मनाला नित्य आल्हाद वाटतो. उत्साह वाटतो. मनाची मरगळ दूर होते. हर्ष, आनंद, उल्हास यांची लयलूट असते. बहुतेक सर्व उत्सव व सण धार्मिक असले तरी त्यांची सामाजिक उपयुक्तता आजही प्रतीत होण्यासारखी आहे. एकंदर मनुष्यस्वभावच उत्सवप्रिय आहे. नित्याच्या चाकोरीतून दूर होण्यासाठी तो काही निमित्त शोधीत असतो. व्रतबंध म्हणजे मुंज, विवाह, बारसे, षष्ठ्यब्दिपूर्ती; इत्यादी वैयक्तिक प्रसंगांनाही कधीकधी उत्सवाचे वा सणाचे स्वरूप येते.

पूर्वी राजे, महाराजे अथवा आताचे काही धनवान यांच्या घरची अशी मंगलकार्ये म्हणजे सर्व गावाला उत्सवासारखीच वाटतात. जीवनकलहात गुंतलेला मनुष्य या उत्सवांत व सणांत ताजा, सतेज व टवटवीत होतो. त्याच्या उपजत गुणांना वाव मिळतो. तो संतुष्ट होतो. संसारग्रस्त मनुष्याच्या दैनंदिन जीवनातील चिंता व व्यथा दूर करून त्याला सुखद अनुभव देण्याचे कार्य असे उत्सव व सण करतात. विविध ठिकाणांच्या यात्रा, जत्रा, यांनाही उत्सवाचेच स्वरूप येते. सर्वांनी मिळून एकत्र यावे, हसावे, नाचावे, मतभेद विसरावेत, असा मूळचा उद्देश या सणांचा व उत्सवांचा असावा.

पितृपूजा, वीरपूजा, नांगरणी, पेरणी, कापणी, नवधान्यांचे स्वागत, वृक्षपूजा, प्राणिपूजा, देवदैवतपूजा, गणदेवता, ग्रामदेवता यांचा समारंभ, अवतारी पुरुषांची स्मृती; अशा अनेक प्रसंगी स्त्रीपुरुष एकत्र येतात, नाचतात, खेळतात व नित्याची दुःखे विसरतात. कथा-कीर्तने, नाचगाणी, नाटके, नृत्ये, गोंधळ, ललितादी प्रकार इत्यादींना उत्सवांत व सणांत महत्त्वाचे स्थान असते. प्राचीन काळी कौमुदी उत्सव, उद्यानयात्रा, पर्वतयात्रा, वनभ्रमण, मृगयाक्रीडा यांनाही उत्सवासारखे महत्त्व होते. वर्षप्रतिपदा, अक्षयतृतीया, नागपंचमी, गौरीगणपती, दसरा, दीपावली, मकरसंक्रांत, होळी; अशा आजच्या उत्सवांत वा सणांत केवढा इतिहास, सामाजिक संदर्भ, सांस्कृतिक महत्त्व आहे हे थोडया विस्ताराने पाहाण्यासारखे आहे. जैन, बौद्ध, शीख, ख्रिश्चन, मुसलमान इत्यादी धर्मांत व धर्मपंथांतही उत्सवांना व सणांना महत्त्व आहे असे दिसून येते. दूर रानावनांत, गिरिकंदरांत राहाणाऱ्या आदिवासींनाही उत्सवांची, सणांची, नृत्यांची, संगीताची आवड असते.

## विविध उत्सव व सण

श्रेष्ठ देवदेवतांची स्थाने, स्थानिक ग्रामदेवतांची मंदिरे, प्राचीन काळातील ऋषिमुनी, महात्मे, संत, सत्पुरुष यांचे जन्मदिन व निर्याणदिन, पंचमहाभूतांतील चमत्कार, विविध वृक्ष, प्राणी यांच्याबद्दल कृतज्ञतापूर्वक स्मरण; अशा विविध नात्यांनी व अंगांनी उत्सव, सण, यात्रा-जत्रा यांची वाढ झाली. मनुष्यास यांचा लोभ वाटतो. आसरा वाटतो. संसारग्रस्त मनुष्यास हे उत्सव व सण म्हणजे मनाचे पोषण वाटते. सामाजिक जीवन, कलात्मक आविष्कार, साहित्यसंगीताची वाढ यांची निर्मिती या उत्सवांमुळे,

सणांमुळे झाली. नृत्य, नाट्य, वाद्य, कवित्व, चित्रकला, मूर्तिकला इत्यादींचा विकास याच संदर्भाने पाहाण्यासारखा आहे.

## आणि नाना व्रतांचे महत्त्व

उत्सव, सण, यात्रा-जत्रा यांच्याजवळ येणारा आणखी एक प्रकार म्हणजे नाना प्रकारची व्रते व वैकल्ये. यांतील बहुतेक सर्व व्रते सकाम म्हणजे मनात इच्छा धरून केलेली असली तरी त्यांत उत्साह, आनंद, समारंभ इत्यादींचा समावेश असतोच. व्रतांचीही कल्पना फार प्राचीन काळापासूनची आहे. पुढे पुढे तर व्रतांची संख्या वाढली. बाराव्या-तेराव्या शतकांत तर ही व्रतसंख्या एक हजारपर्यंत गेली. पुराणकारांनीही व्रतांत भर घातली. व्रतांचे आचरण करताना संकल्प, पूजा, होम, उपवास, दानं, जागरण, पारणे, उद्यापन इत्यादींचा समावेश होतो. शुभ दिवस पाहून व्रताचा आरंभ केला जातो. प्रात:काली आहार न घेता, स्नान करून, सूर्यादिकांना नमस्कार करून व्रताचा आरंभ होतो. अभिषेक, गुरू व द्विज यांचे पूजन, पूजा, होम इत्यादींना व्रतात महत्त्व असते. कृच्छ्र, अर्धकृच्छ्र, चांद्रायण इत्यादी व्रते प्रायश्चित्तस्वरूप असतात. ब्रह्मचारी, स्नातक, गृहस्थ यांनी आचारावयाची कर्तव्यरूप व्रते असतात. एखाद्या फलाच्या प्राप्तीसाठीही व्रते करतात. ब्रह्मयज्ञ, पंचमहायज्ञ, अशीही काही व्रते नित्य केली जातात. पुत्र, धन, सौभाग्य, ऐश्वर्य, सत्ता इत्यादींच्या प्राप्तीसाठी सत्यनारायण, सत्यविनायक, सोळा सोमवार; अशी काही व्रते करतात.

सत्य, अहिंसा, अचौर्य, ब्रह्मचर्य, अकुटिलता; ही काही मानसिक व्रते सांगितली आहेत. गणेश, शिव, देवी, विष्णू, सूर्य इत्यादी देवदेवतांसाठीही व्रते करतात. सत्य, दया, क्षमा, दान,

शुद्धी, अस्तेय, इंद्रियनिग्रह, देवपूजा, हवन, संतोष यांना व्रत-साधनेत महत्त्व असते. व्रतांचे काही नियम असतात. ते पाळणे अगत्याचे असते. व्रत हे लोकसाधन व भोगसाधन मानले गेले असल्याने आजही त्याची लोकप्रियता टिकून आहे. पुण्य, संतती, यश, आरोग्य, ऐश्वर्य, सौंदर्य, कीर्ती, विद्या यांसाठी व्रतसाधना करतात.

# २) वर्षप्रतिपदा, गणगौर, अक्षयतृतीया

## शालिवाहन शकाचा प्रारंभ

आपल्या वर्षाचा पहिला महिना चैत्र. शालिवाहन शकाचा महिमा आज राष्ट्रीय शक म्हणून मान्य झाला आहे. आज या शकास प्रारंभ होऊन सुमारे १९०७–०८ वर्षे झाली आहेत. या शालिवाहन शकाचा प्रारंभ चैत्रापासून होतो. फार प्राचीनकाळी केव्हातरी आपल्या वर्षाचा प्रारंभ मार्गशीर्षापासून होत होता. भगवद्गीतेच्या दहाव्या अध्यायात 'मासानां मार्गशीर्षोऽहम्' (३५) असे म्हटले आहे. सर्व महिन्यांत मी मार्गशीर्ष आहे, असे भगवंत म्हणतात. त्यावेळी बारा महिन्यांचा प्रारंभ मार्गशीर्षा-पासून होत होता. महाभारत, वाल्मीकीरामायण यांतही असाच उल्लेख आहे. मृगशीर्ष हे वर्षारंभाचे नक्षत्र म्हणून ओळखत असत. कलियुगाची ३१७९ वर्षे झाल्यावर हा शक सुरू झाला असावा.

हा शक शालिवाहन वा सातवाहन नावाच्या राजाने सुरू केला. कुशाणवंशीय कनिष्काने या शकाचा प्रारंभ केला असेही मानतात. तेराव्या शतकातील लेखात याचा शालिवाहन शक नावाने उल्लेख येतो.


पैठणच्या सातवाहन राजाच्या संबंधी अनेक आख्यायिका आहेत. एका ब्राह्मणास दोन मुलगे व एक कन्या अशी अपत्ये होती. आई-वडिलांच्या निधनानंतर ही मुले भटकत भटकत पैठण येथे येऊन एका कुंभाराच्या घरी राहू लागली. एके दिवशी ब्राह्मणकन्या गोदावरी नदीवर गेली असताना एका शेषाचे मन तिच्यावर जडले. त्याने तिला वश केले. तिला मुलगा झाला. कुंभाराच्या घरी राहाणारा हा मुलगा मातीची उत्तम खेळणी बनवू लागला. मातीच्या भातगाड्या करून हा इतरांना त्या खेळण्यासाठी देई. भात म्हणजे साळी. म्हणून या मुलास शालिवाहन असे नाव पडले.

यावेळी पैठणास सोमकांत व उज्जयिनीस विक्रमादित्य राज्य करीत होते. विक्रमादित्याने पैठणवर स्वारी करून सोमकांताचा पराभव करून त्याला कैदेत ठेविले. यावेळी शालिवाहन मातीचे हत्ती, घोडे, शिपाई करून खेळण्यात रमलेला होता. त्याने नंतर शेषराजाचे स्मरण केले. त्या मातीच्या खेळण्यांत त्याने प्राण फुंकले. तेव्हा त्यांतून अनेक शिपाई, घोडेस्वार तयार झाले.यांच्या मदतीने शालिवाहनाने विक्रमादित्याचा पराभव केला. नर्मदा नदीच्या पलीकडे त्याला त्याने पिटाळून लावले. सोमदत्त राजाची सुटका झाली. त्याच्या नंतर पैठणचा राजा शालिवाहनच झाला. हेच राजे पुढे सातवाहन या नावाने ओळखले गेले. महाराष्ट्रात सार्वभौम सत्ता स्थापन करणारे हेच पहिले राजघराणे होय. याच

राजांना पुराणांत आंध्र अथवा आंध्रभृत्य म्हटले आहे. सातवाहन, सिमुक, कृष्ण, पहिला सातकर्णी, दुसरा सातकर्णी, गौतमीपुत्र सातकर्णी, शिवश्री, पद्मश्री; इत्यादी प्राचीन राजांनी विद्या, कला, स्थापत्य, धर्म, शिल्प इत्यादींत फार मोठी कीर्ती संपन्न केली.

## गुढीची पूजा

या राजांच्या आठवणीसाठी आपण शालिवाहन शक पाळतो.



आपल्या भारत सरकारनेही यास राष्ट्रीय शक म्हणून मान्यता दिलेली आहे. या वर्षारंभाच्या दिवशी आपण आपल्या दारात गुढी उभी करतो. गुढीस नवे वस्त्र, लिंबाची पाने, हार, गाठी इत्यादी बांधतो. गुढीच्या मुळाशी रांगोळी काढून कुंभार शालिवाहनाची स्मृती म्हणून पाच मातीच्या लहान लहान मूर्ती करतो. त्यांची व गुढीची पूजा करतो. आपण कडूलिंबाची पाने भक्षण करतो. लहान गुलांची नव्याने शाळा याच दिवशी सुरू होते. कडूलिंबाची कोवळी पाने मिऱ्ये, हिंग, मीठ, जिरे, अजमोदा इत्यादीत खलून ते मिश्रण खाल्ल्यास आरोग्यदायक असते. याच दिवशी नव्या पंचांगाची पूजा होते. ब्राह्मण, ज्योतिषी यांचे पूजन होते. मंगल-वाद्ये वाजतात. आपण नवे कपडे घालतो. घरात गोड पदार्थ करतो. थोर पुरुषांच्या कथा ऐकतो. एकमेकांना भेटी देतो. नव्या वर्षाच्या या पहिल्या दिवसास पाडवा वा वर्षप्रतिपदा म्हणतात. हा आपला क्रमाने पहिला सण. या सणास सार्वजनिक असे स्वरूप बहुधा नसते. वसंतऋतूची सुरुवात झाल्याने या दिवसास विशेष महत्त्व आहे. साडेतीन मुहुर्तांतील हा एक प्रमुख मुहूर्त होय.

शालिवाहन शकाच्या या पहिल्या महिन्यात चित्रा नक्षत्र असल्याने यास चैत्र असे नाव पडले आहे. याच महिन्यास मधुमास असेही म्हणतात. वर्षप्रतिपदेस सूर्योदयाच्या वेळी ब्रह्मदेवांनी सृष्टी निर्माण केली असेही सांगतात. काही ठिकाणी चंडिकेचे नवरात्र याच दिवशी सुरू होते. उन्हाळा सुरू होत असल्याने काही ठिकाणी पाणपोई सुरू होते. रस्त्यावरील येणाऱ्या-जाणाऱ्या पांथस्थास पाणी देणे हे एक मोठे सत्कृत्य मानले गेले आहे.पाण्याने भरलेला एखादा कुंभ दान देण्याचीही चाल काही ठिकाणी आहे. तिसऱ्या दिवसा-पासून शंकरासह गौरीचे पूजन सुरू होते. पुढे महिनाभर दोलोत्सव

सुरू होतो.याच दिवशी पहिलो अवतार मत्स्य भगवान यांचा जन्म झाला. अष्टमीस भवानीची उत्पत्ती झाली. नवमीस श्रीरामांचा जन्म झाला. त्या दिवशी सर्वत्र रामनवमीचा उत्सव मोठ्या थाटाने साजरा होतो. एकादशीस दोलोत्सव होतो. या दिवशी विष्णुपूजक लक्ष्मीसह विष्णूंना झोपाळ्यावर बसवून झोका देतात. विष्णूंची पूजा दवण्याने करतात. चैत्र महिन्यात रोज सकाळी अंगण स्वच्छ करून, सडा टाकून सुरेखशी रांगोळी काढली जाते.

## चैत्रगौरीचा उत्सव, गणगौर

शुद्ध तृतीयेस महाराष्ट्रात चैत्रगौरीचा उत्सव करतात. गौरीला लहानशा झोपाळ्यावर बसवून तिच्यापुढे आरास करतात. हळदी-कुंकवाचा समारंभ करतात. गौरीपुढे नाना प्रकारची फळे, खाद्य-पदार्थ मांडतात. नारळांना कुंच्या घालून, त्यांची बाळे करून गौरीपुढे ठेवितात. हळदी-कुंकवास आलेल्या सुवासिनींचे पाय धुतात, त्यांना शीतल चंदन लावतात, त्यांची ओटी भरतात. आंब्याची डाळ, पन्हे देऊन त्यांचा व कुमारिकांचा सत्कार करतात. या दिवशी गौरी आपल्या माहेरी आलेली असल्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत असते. ती पुढल्या महिन्यात अक्षयतृतीयेस सासरी जाते अशी समजूत आहे.

राजस्थानातील कुमारी व सुवासिनी गौरीचा हा उत्सव गणगौर म्हणून साजरा करीत. चांगला वर मिळावा म्हणून कुमारिका व सौभाग्याची वृद्धी व्हावी म्हणून सुवासिनी गौरीची पूजा करतात. होळीची राख व शेष यांच्या आठ पिंडी मुली बनवितात. सकाळी मैत्रिणींबरोबर गाणी म्हणत म्हणत त्या पाणी व दूर्वा आणतात. दूर्वांवर पिंडी ठेवून त्यांची पूजा त्या करतात. अशी

पूजा होळीच्या दुसऱ्या दिवसापासून चैत्राच्या तिसऱ्या दिवसापर्यंत मोठ्या थाटाने व उत्साहाने चालते. अठरा दिवस रोज रात्री मुली गणगौरीची गाणी गातात. यांपैकी एक गाणे असे आहे–

**चौको दे चौको दे, ईश्वर की भाण चौको दे ।**
**चौके दे, गोकुलचंदकी भाण चौको दे ।**
**गौर ए, गौरमाता खोल कींवाडी ।**
**बाहर उबी थारै पूजणवाली ।**
**पूजो ए, पूजावो सैय्यो कायूँ जो मांगो ?**
**अन मागाँ, धन मागाँ, लछ मागाँ लिछमी ।**
**जलहर जामो बाबल मागाँ राता देई मायड ।**
**कात कँवर सो बीरो मागाँ रोई सी भौजाई ।**

चैत्र शुद्ध तृतीयेस सायंकाळी गणगौरीची मिरवणूक निघते. नदीत वा तलावात गौरीचे विसर्जन होते. या उत्सवात घरातील मुलींना मेवामिठाई, नवीन वस्त्रे यांचा लाभ होतो. या उत्सवाच्या निमित्ताने राजस्थानात मोठमोठे मेळे भरतात. या व्रताची वा उत्सवाचीही एक कथा आहे.

एक राजा व एक माळी यांनी एकदा शेती करायचे ठरविले. राजाने यवांची व हरभऱ्यांची पेरणी केली. माळ्याने दूर्वा लावल्या. हरभऱ्यांचे पीक चांगले वाढू लागले. पण माळ्याच्या दूर्वा मात्र वाढेनात. रोजच्या रोज खुरटू लागल्या. असे का होते हे माळ्यास समजेना. कारण शोधण्यासाठी तो एके दिवशी आपल्या बागेत लपून बसला. तेव्हा त्याला समजले की, रोज गावातील मुली येतात व दूर्वा खुडून नेतात. त्याच्या दूर्वा कशा

वाढणार? माळ्याने त्या मुलींना अडविले. त्या घाबरून म्हणाल्या,

'माळीबोवा, आम्ही गणगौरीची पूजा करीत आहोत. आम्हांला यासाठी दूर्वा लागतात. आम्ही इथूनच दूर्वा खुडून नेतो. तुमची परवानगी असावी. आम्ही रोज तुम्हांस गौरीचा प्रसाद देत जाऊ.'

माळ्याने त्यांचे म्हणणे मान्य करून दूर्वा नेण्यास परवानगी दिली. रोज पूजा झाल्यावर माळ्याकडे प्रसाद येऊ लागला. एके दिवशी माळी घरी नव्हता. त्याच्या आईने प्रसाद त्याच्या खोलीत ठेवण्यास सांगितले. काही दिवसांनी माळी घरी परत आला. त्याने खोली उघडून पाहिली, तो तेथे ईश्वर महादेव व गणगौर यांचे त्याला दर्शन झाले. माळी संतुष्ट झाला.

उत्तर प्रदेशातही हा गणगौरीचा सण करतात. तेथे चैत्र शुद्ध तृतीया हा दिवस पार्वतीची जन्मतिथी मानतात. सुवासिनी या दिवशी वाळूची गौरीची मूर्ती करतात. तिची पूजा करून तिला सौभाग्यद्रव्ये अर्पण करतात. तिची कहाणी ऐकतात. नंतर गौरीला वाहिलेला शेंदूर आपल्या केसांच्या भांगात लावतात. या दिवशी स्त्रिया एकभुक्त राहून गौरीचा प्रसाद घेतात. हा प्रसाद पुरुषांना मिळत नाही.

## राजस्थानातील उत्सव, आहेरिया, वसंतोत्सव

अशा रीतीने गणगौरीचा हा सण उत्तरेत मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. गौरीची स्तुतिस्तोत्रे गातात, अभय, कल्याण, सौभाग्य, दीर्घायुष्य, ऐश्वर्य यांच्या प्राप्तीसाठी गौरीस प्रार्थना करतात. मोठ्या शहरांतून गौरीची मिरवणूक निघते. स्त्रिया मोठ्या प्रेमाने गौरीभोवती फेर धरून, टाळ्या वाजवून गौरीची

गाणी म्हणतात. नृत्य करतात. सायंकाळी आतषबाजीचे नयनमनोहर काम होते.

गौरीच्या पूजनासारखाच आहेरिया, वसंत, फाग इत्यादी उत्सव राजस्थानात महत्त्वाचे आहेत. नव्या धान्याच्या दर्शनाने सर्व स्त्रिया आनंदित होतात. उपवनात जाऊन अन्नपूर्णेचे भांडार तृप्त होऊन पाहातात. आनंदाने गाणे म्हणतात. झोपाळ्यावर बसून झोके घेतात. वसंतऋतूच्या या आनंदाचे वर्णन एका जुन्या पुस्तकात असे केले आहे–

**वृक्षस्कंधा बांधुनी लांब दोले ।**
**घेती नारी बैसुनी तेथ झोले ।।**
**ओव्या गाती स्वप्रियातें बहाती ।**
**क्रीडायातें, लोकलीला पहाती ।।**

आहेरिया, वसंतोत्सव, भानुसप्तमी, मदनोत्सव हे सण याच काळात राजस्थानात पाळले जातात. राजपूत स्त्री-पुरुषांना मृगयेची मनापासून आवड असते. वसंत ऋतूत वृक्षांना नवीन पालवी फुटते. सर्वत्र वनश्री फुललेली असते. कोकिळ पक्ष्यांचे गायन सुरू होते. वसंत ऋतूच्या आगमनाने राजपुतांना अत्यंत आनंद होतो. याच काळात मृगयेस प्रारंभ होतो. एखाद्या मुहूर्तावर राजपूत शिकारीसाठी वनात जातात. बसंती वर्णाचा पोशाख करून ते घोड्यांवर स्वार झालेले असतात. त्यांच्याजवळ शस्त्रे असतात. या आहेरियाच्या मृगयेचा पशू म्हणजे वराह होय. ते राजपूत आपल्या भाल्याने वराहाची म्हणजे डुकराची शिकार करतात. कित्येकदा शिकारीही या कामी जखमी होतो. या दिवशी राजपुतांचे साहस व शौर्य यांचे दर्शन होते. राजपुतांच्या या शौर्यावर

व पराक्रमावर राजपूत रमणी मनापासून प्रेम करतात. आहेरियाच्या प्रसंगी राजपूत स्त्रियाही पराक्रम दाखवितात. आहेरियाची ही मृगया शिवानीच्या म्हणजे गौरीच्या तृप्तीसाठी असते. गौरीस वराहाचा नैवेद्य फार आवडतो. चैत्रगौरीच्या निमित्ताने अन्नपूर्णेचे दर्शन होते. चैत्राच्या पौर्णिमेच्या सुमारास कामदेवाचा उत्सव सुरू होतो. पुष्पशृंगाराने सर्व स्त्री-पुरुष नटतात. या उत्सवास मदनत्रयोदशी व मदनचतुर्दशी म्हणतात. राजपूत रमणी कामदेवाची गाणी गातात. एका गाण्यात म्हटले आहे,

'पुष्पाचं धनुष्य धारण करणाऱ्या कामदेवा, तुझं स्वागत असो. मीनाचा ध्वज धारण करणाऱ्या वीरा, तुझा विजय असो. दिव्य शक्तिमान देवा, तुझं स्वागत असो. तू ऋषींनाही आपल्या निश्चयापासून चलित् केलं आहेस. या मदनाचा विजय असो. या कामाचा म्हणजे देवांच्याही देवाचा विजय असो. यानं ब्रह्मदेव, विष्णू, महेश्वर,. इंद्र यांनाही आपल्या बाणानं व्यथित केलं आहे.'

## भगवान मत्स्यांचा पराक्रम

चैत्रातच आणखीही उत्सवाचे नाना प्रकार येतात. भगवान मत्स्यांचा जन्मदिवस चैत्र शुद्ध तृतीया आहे. दुष्टांचा संहार व सज्जनांचे रक्षण करण्यासाठी ईश्वराने मत्स्याचा जन्म धारण केला. मत्स्यावतार हा दहा अवतारांतील प्रथमावतार होय. ब्रह्मदेवांची रात्र सुरू झाली तेव्हा सर्वत्र प्रलय सुरू झाला. स्वर्ग, पृथ्वी, पशू, पक्षी, राक्षस, यक्ष, देव, मनुष्ये, सर्व त्या जलात बुडाले. सर्वत्र अधर्म माजला. ब्रह्मदेव निद्राधीन असताना हयग्रीव नावाच्या दैत्याने त्यांच्या मुखातील वेद पळवून नेले. या दैत्याचा संहार करण्यासाठी भगवान विष्णूंनी मत्स्यावतार धारण केला. या समयी

पृथ्वीवर सत्यव्रत नावाचा राजा राज्य करीत होता. हा तपस्वी राजा एकदा कृतमाला नदीत स्नान करीत होता. तेव्हा त्याच्या ओंजळीत एक मत्स्य आला. या मत्स्याला राजा फेकून देणार, एवढ्यात मत्स्य म्हणाला,

'राजा, तू माझं रक्षण कर.'

'मत्स्या, मी तुझं कसं रक्षण करू ?'

'तू मला घरी नेऊन एका कमंडलूत ठेव.'

राजाने त्याप्रमाणे मत्स्याला कमंडलूत ठेविले. तो तेथे मोठा झाला. कमंडलूत तो मावेना. मोठ्या भांड्यात, विहिरीत, सरोवरातही तो मोठा होत गेल्याने राजास नवल वाटून तो म्हणाला,

'मत्स्यरूपानं मला मोहित करणारा तू कोण आहेस ?'

'राजा, आजपासून सातव्या दिवशी सर्वत्र जलप्रलय होणार आहे. त्यावेळी सर्व सृष्टी बुडणार आहे. मी एक नौका तुझ्याकडं पाठवीन. तेव्हा तू व सप्तर्षी यांनी त्या नौकेत बसावं.'

याप्रमाणे सातव्या दिवशी सर्वत्र जलप्रलय झाला. सर्व सृष्टी पाण्यात बुडून गेली. पर्वत, डोंगर, वृक्ष, वेली, पशू, पक्षी, जनावरे, माणसे सर्व बुडून मेले. पण ठरल्याप्रमाणे सत्यव्रतास एक नौका पाण्यावरून येताना दिसली. त्या नौकेवर तो सप्तर्षींसह चढला. राजाने नाव मत्स्याच्या शिंगास बांधून त्याची स्तुती केली. प्रलयकाल संपल्यावर मत्स्य भगवानांनी हयग्रीव दैत्यास मारले. वेदांची मुक्तता केली. मत्स्यभगवानांच्या या पराक्रमाची स्मृती आपण मत्स्यजयंतीस करीत असतो.

## श्रीरामांचे अद्‌भुत कृत्य

यानंतर आणखी एका अवताराचा जन्म याच चैत्र महिन्यात

असतो. चैत्र शुद्ध ९ हा दिवस सर्व भारतात रामनवमी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी श्रीरामांच्या जन्माचा उत्सव साजरा होतो. प्रभू रामचंद्र व श्रीकृष्ण ही भारताची दोन राष्ट्रीय दैवते आहेत. भारतीय जनमानसावर श्रीराम व श्रीकृष्ण यांच्या कर्तृत्वाचा फार मोठा प्रभाव आहे. अयोध्येचा राजा दशरथ व त्याची राणी कौसल्या यांच्या पोटी सूर्य मध्यान्हीस आला असताना प्रभू रामचंद्रांचा जन्म झाला. राजा दशरथास तीन राण्या होत्या. तरी एकीच्याही पोटी संतान नव्हते. पण पुत्रकामेष्टी यज्ञ केल्यावर अग्निदेवाच्या कृपेने कौसल्येस रामचंद्र, कैकेयीस भरत, सुमित्रेस लक्ष्मण व शत्रुघ्न अशी मुले झाली. श्रीरामचंद्र अत्यंत बुद्धिमान, पराक्रमी व तेजस्वी होते. त्यांनी दक्षिणेकडे चौदा वर्षांचा वनवास भोगून अलौकिक कृत्ये केल्यामुळे भारतीयांनी त्यांना अवतारी पुरुष मानले.

श्रीराम सत्यवचनी, पितृवचन पाळणारे, एकपत्निव्रताने राहाणारे, एकवचनी होते. म्हणून भारतीयांचे त्यांच्यावर मनापासून प्रेम आहेच. पण त्यांचे एकच महान कृत्य त्यांची कीर्ती अजरामर करणारे आहे. देवादिकांना त्रास देऊन बंदीत टाकणाऱ्या, सतीसाध्वींची अब्रू लुटणाऱ्या, खुद्द श्रीरामचंद्रांच्या पत्नीस, सीतेस पळवून नेणाऱ्या बलाढ्य व शक्तिमान रावणाचा श्रीरामांनी वध केला. रामांचा अवतार जणू याच कामासाठी होता. रावण महाभयंकर होता. तो ऋषिमुनींच्या यज्ञांचा नाश करी. त्यांना अतोनात त्रास देई. ' रावयति विद्रावयतीति रावणः '—प्रजेला त्रास देणारा रावण, असे याचे नाव होते. सर्व राक्षसांचा राजा रावण लंकेत राज्य करून देवांब्राह्मणांना, साध्वी स्त्रियांना अत्यंत त्रस्त करी. त्याच्या छळामुळे सर्व पृथ्वी गांजून गेली होती. ती गाईसारखी

दीन होऊन क्षीरसागरनिवासी श्रीविष्णूंना शरण गेली. आपल्या विकल स्वरांनी तिने त्यांच्यापाशी करुणा भाकली. भगवान विष्णूंनी तिला आश्वासन देऊन दशरथाचा पुत्र म्हणून त्यांनी अवतार धारण केला व रावणादिकांचा नाश केला. सर्व प्रजेला सुखी केले. श्रीरामांच्या चरित्रकथेवर महर्षी वाल्मीकींनी ' रामायण ' या नावाचे जे महाकाव्य लिहिले ते आदिकाव्य या नावाने प्रसिद्ध आहे. शुद्ध दशमीस भरत, शुद्ध एकादशीस लक्ष्मण यांचा जन्म झाला. या सर्व बंधूंचा, त्यांना साह्य करणाऱ्या हनुमंताचा, सुग्रीवाचा, बिभीषणाचा फार मोठा प्रभाव भारतीय मनावर आहे.

## ' हनुमंत आमुचें दैवत '

याच महिन्यात शुद्ध त्रयोदशीस तीर्थंकर महावीर यांचा जन्म आहे. हे जैनांचे चोविसावे तीर्थंकर असून यांच्या जयंतीचा मोठा उत्सव जैन लोक करतात. राग, द्वेष, मत्सर, हिंसा यांना जिंकून वीतरागी होण्यास हा धर्मपंथ शिकवितो. श्रीराम, श्रीकृष्ण, भवानी दुर्गा यांच्याप्रमाणे भारतीय मनावर फार मोठा प्रभाव असणारे एक शक्तिशाली दैवत म्हणजे श्रीहनुमान होय. श्रीरामांच्या या नम्र सेवकाची मंदिरे जवळजवळ सर्व गावी आहेत. बलोपासक तरुण मुले याच हनुमंताची वा मारुतीची उपासना करतात. बुद्धी व बल यांचा आदर्श उभा करणारा हा हनुमान चैत्री पौर्णिमेस जन्मास आला. त्याच्या पराक्रमासाठी, त्याच्या बुद्धीसाठी, त्याच्या दासभावासाठी आजही अनेकजण त्याचा आदर्श मानतात. सार्वजनिक रीतीने, समूहाने त्याची जयंती सूर्योदयापूर्वी साजरी करतात. त्याचा प्रसाद घेतात. कीर्तनात त्याचे आख्यान लावतात.

गौतमकन्या अंजनी व सुमेरीचा राजा केसरिन यांचा हा पुत्र. दशरथाच्या पुत्रकामेष्टी यज्ञातून मिळालेल्या प्रसादाचा एक भाग घारीने नेला व तप करीत बसलेल्या अंजनीच्या ओटीत टाकला. अंजनीने तो ग्रहण केल्यावर तिला एक बलवान पुत्र झाला. जन्मतःच त्याने सूर्याचा उदय पाहिला. तो ते फळ समजून त्याच्यावर झेपावून गेला. या गडबडीत त्याची हनुवटी फुटली व तो मरुताचा, वायूचा पुत्र मारुती वा हनुमान झाला. हनुमान रामचंद्रांचा आदर्श भक्त होता. सीतेचा शोध लावण्यात याने अतुल पराक्रम केला. लंकेचे दहन केले. अशोकवनाचा याने विध्वंस केला. रामरावणयुद्धात जे मरण पावले त्यांना जिवंत करण्यासाठी याने द्रोणागिरीच उचलून आणला. त्यावरील औषधांनी लक्ष्मणादी वीरपुरुष सजीव झाले. अशा या पराक्रमी, बलशाली हनुमंतास वज्रदेही, वजरंग, वलभीम इत्यादी नावांनी ओळखतात.

वलाची उपासना जोपासली जावी म्हणून प्रसिद्ध रामभक्त श्रीरामदासस्वामी यांनी या हनुमानाची उपासना सर्व भारतात प्रसारित केली. 'आमुचे कुळीं हनुमंत। हनुमंत आमुचें दैवत। तयावीण आमुचा परमार्थ। सिद्धीतें न पावे कीं' अशी समर्थ रामदासांची निष्ठा होती. समर्थांनी स्थापिलेले अकरा मारुती तर प्रसिद्धच आहेत. प्रत्येक खेड्यातील मारुतीच्या मूर्तीची पूजा होते. याच्याच स्मरणाने पैलवानांचा आखाडा समृद्ध बनतो. दर शनिवारी मारुतीची पूजाअर्चा होते. एकनिष्ठ सेवक व भक्त म्हणूनही या हनुमंताचा लौकिक आहे. 'काय भक्तीच्या त्या त्राटा। मज दावाव्या सुभटा' म्हणून समर्थ रामदासांनी भक्तिमार्ग यालाच विचारला आहे. हनुमानाचे मन अत्यंत सूक्ष्म व वायुगतीने जाणारे

होते. तो वाटेल ते रूप धारण करणारा होता. त्याचा वेग वाऱ्याप्रमाणे प्रचंड होता. तो बुद्धिमंतांत वरिष्ठ होता. त्याची इंद्रिये त्याच्या स्वाधीन होती. तो वानरसमुदायात मुख्य होता.

## पंजाबातील वैशाखी

यानंतर वैशाखाचा महिना सुरू होतो. या महिन्यातील पौर्णिमा विशाखा नक्षत्राने युक्त असल्याने यास वैशाख म्हणतात. याचे प्राचीन नाव माधव असून वसंतऋतूतील हा दुसरा महिना होय. या मासात प्रखर उन्हाळा असल्याने यातील उत्सव व सण उन्हाळ्यास अनुकूल असेच असतात. या महिन्यात प्रात:स्नान करण्यासाठी सांगितले आहे. या महिन्यात कृष्ण व श्वेत तुलसीदलांनी भगवंतांची पूजा करावी. अश्वत्थाच्या मुळांना पाणी घालावे. जलदान करावे. देवावर जलाचा अभिषेक करावा. पादत्राणे, छत्रे, पंखे, तलम वस्त्रे, चंदन, उदकपात्रे, पुष्पे, शीतल पेये, द्राक्षे, केळी यांच्या दानाचे महत्त्व विशेष प्रकाराने सांगितले आहे. परशुरामजयंती याच महिन्यात येते. शुद्ध सप्तमीस गंगेची पूजा करतात. कारण या दिवशी गंगा जन्हूच्या उजव्या कानातून बाहेर पडली. बंगालमध्ये वैशाख शुद्ध नवमी सीतानवमी म्हणून ओळखली जाते. कारण या दिवशी यज्ञासाठी भूमी नांगरीत असताना जनकराजाला सीतेची प्राप्ती झाली. दशमीस शंकराचार्यांची जयंती व पौर्णिमेस भगवान बुद्धांचा जन्म त्यांचे अनुयायी पाळीत असतात.

उत्तर भारतात, विशेषत: पंजाबात वैशाखी नावाचा सण विशेष रीतीने साजरा करतात. आनंदाने सर्व लोक जत्रांत रमलेले असतात. निरनिराळे खेळ, गाणी यांची लयलूट असते. या दिवशी गुरुद्वारात जाऊन शीख लोक ग्रंथसाहेबाचे पठण करतात. या

ग्रंथाची वाजतगाजत मिरवणूक काढतात. कारण या वैशाख शुद्ध प्रतिपदेस गुरू गोविंदसिंगांनी याच दिवशी खालसाची स्थापना केली. या दिवशी निघालेल्या मिरवणुकीत पंचप्यारे, पाच नेते हातांत तलवारी घेऊन नाचत असतात. कार्यक्रमाच्या शेवटी भोजन होते. भांगडा नृत्य होते. या दिवशी हजारो शीख अमृतसरच्या मंदिरात जाऊन तेथील तलावात स्नान करतात.

## अक्षयतृतीयेचे महत्त्व

वैशाख शु. ३ हा दिवस अक्षयतृतीया म्हणून प्रसिद्ध असून या दिवशी केलेले पुण्य अक्षय होते असा समज आहे. कृतयुगाचा प्रारंभ या दिवशी झाला अशी श्रद्धा आहे. वर्षातील साडेतीन मुहुर्तांपैकी हा एक दिवस मानतात. पितृस्वरूप जनार्दनांना या दिवशी ब्राह्मणाद्वारे उदककुंभ देण्यात येतो. हा दिवस वसंतोत्सवाचा म्हणूनही प्रसिद्ध आहे. मथुरा, वृंदावन, अयोध्या, काशी, द्वारका इत्यादी ठिकाणी वसंतगौरीचा उत्सव आजही मोठ्या थाटाने साजरा होतो. कौमार्यावस्थेत माहेरी आलेली वसंतगौरी यौवनावस्था प्राप्त होताच अक्षयतृतीयेला सासरी जाते, असा समज आहे. असे सांगतात की, याच सुमारास सृष्टीतील झाडे वैवाहिक स्थितीचा अनुभव घेतात. फुलांफळांनी समृद्ध होतात. आम्रादिकांना कोवळी व लुसलुशीत, तांबुस पालवी फुटते. सृष्टीस यौवन व मातृत्व प्राप्त होते. या कडक उन्हाळयात तृषार्तांना शीतल जल देणे फार महत्त्वाचे मानले गेले आहे. या तिथीस काही लोक आखेती म्हणतात. या शुभ मुहुर्तावर शेतांत धान्यपेरणी करण्याची प्रथा आहे. वसंतगौरीच्या उत्सवास दोलोत्सवही म्हणण्याचा प्रघात आहे. नानकजयंती, शंकराचार्यजयंती, श्रीनृ-

सिंहजयंती, कूर्मजयंती, नारदजयंती; असे लहानमोठे उत्सवाचे प्रसंग याच महिन्यात येतात.

# ३) शिवराज्याभिषेक, गंगावतरण, आषाढीएकादशी टिळकपुण्यतिथी

आपल्या मासगणनेनुसार ज्येष्ठ हा तिसरा महिना असून याच्या पौर्णिमेच्या आसपास ज्येष्ठा नक्षत्र असल्याने याला ज्येष्ठ असे नाव आहे. या महिन्याच्या प्रतिपदेपासूनच दशहरा स्नानाला प्रारंभ होतो. ज्येष्ठ शुद्ध दशमीस भागीरथी नदी स्वर्गातून पृथ्वीवर आली अशी कल्पना प्राचीन काळापासूनची आहे. या दिवशी गंगा-स्नान केल्याने पुण्य लाभते अशी समजूत आहे. दहा पापे हरण करणारी ही तिथी दशहरा या नावाने प्रसिद्ध आहे. याच दिवशी रामचंद्रांनी सेतुबंध रामेश्वराची स्थापना केली. म्हणून या दिवशी याचीही पूजा केली जाते.

## शिवराज्याभिषेक दिन

याच महिन्याच्या शुद्ध त्रयोदशीस शिवराज्याभिषेकदिन साजरा केला जातो. तेराव्या-चौदाव्या शतकानंतर महाराष्ट्रात स्वतंत्र, समर्थ असा राजा नव्हता. बहुतेक ठिकाणी परकीय सत्ता होती. परंतु सतराव्या शतकात पुण्याच्या आसपास राजे शिवाजी यांचा प्रभाव वाढला व त्यांनी परकीय सत्तेस शह देण्याचा प्रयत्न केला. उगाच विरोध करणाऱ्या स्वकीयांनाच नव्हे तर अदिलशहा,कुतुब-

शहा इत्यादी पातशहांनाही शिवरायांनी चांगलाच वचक बसविला. आपले क्षत्रियत्व सिद्ध करून रायगडावर राज्याभिषेकाची तयारी केली. ' महानद्यांची पुण्योदके, सुलक्षणी गजाश्व, व्याघ्रचर्मे, छत्र-चामरादी राजचिन्हे, सुवर्णकलश, सिंहासन इत्यादींची तयारी झाली. आप्तजन, विद्‌वान, पंडित, सरदार, सेवक यांना निमंत्रणे गेली. ज्येष्ठ शु. ४ रोजी राजे यांची मुंज झाली. ज्येष्ठ शु. १३ रोजी राजे यांनी मंगलस्नान केले. उंची वस्त्रे व आभूषणे धारण केली. तीन घटका रात्र उरली तेव्हा शिवाजीराजांनी सिंहासना-वर आरोहण केले. ब्राह्मणांनी मंत्राक्षता व रौप्यसुवर्णपुष्पांची वृष्टी राजांवर केली. तोफांची सरवत्ती झाली. गागाभट्टांना एक लाखाची दक्षिणा मिळाली. बहुमोल वस्त्रे समर्पित झाली. गोसावी, तापसी, गोरगरीब यांचाही सन्मान झाला.

या राज्यारोहणप्रसंगी इंग्रजांनी शिवाजी महाराजांना एक अंगठी, चांगली खुर्ची, हिरेजडित शिरपेच, दोन हिरेजडित सलकडी व मोती; अशा वस्तू अर्पण केल्या. या समारंभास पन्नास लाखांवर खर्च झाला. नवीन राज्याभिषेक शक सुरू झाला. पाच-सहा शतके पारतंत्र्यात खितपत पडणाऱ्या महाराष्ट्राने शिव-रायांच्या पराक्रमाने सन १६७४ साली स्वातंत्र्यसूर्याचे दर्शन घेतले. या महान प्रसंगाचे वर्णन करताना बखरकारांनी म्हटले आहे, ' ते समयी मंगलवाद्ये, भेटी, गायनादी समारंभ होऊन सर्वही आकाश पृथ्वी शब्देकरून पूर्ण जाली. ' या अभिमानास्पद, शौर्य-पूर्ण व मंगल उत्सव प्रसंगाची स्मृती आजही सर्व महाराष्ट्रात उत्साहाने पाळली जाते. शिवाजी, संभाजी, राजाराम, शाहू आणि नंतरचे चारपाच कर्तबगार पेशवे यांनी महाराष्ट्रातील स्वराज्याचा विस्तार करून हिंदूंचा देवधर्म राखला.

## गंगानदीचे अवतरण

महाराष्ट्रात जसे शिवराज्याभिषेकास महत्त्व आहे, तसेच ते गंगानदीस सर्व भारतात आहे. ज्येष्ठ शुद्ध दशमीस इश्वाकुकुलातील प्रसिद्ध राजा भगीरथ याने स्वतःच्या पितरांच्या उद्धारासाठी मोठा प्रयत्न करून गंगानदीस पृथ्वीवर आणले. गंगानदी स्वर्गातून विष्णूंच्या चरणापासून निघाली ती शंकरांनी आपल्या मस्तकावर धारण केली. हरिद्वार, प्रयाग, वाराणसी इत्यादींना तिने तीर्थक्षेत्रांचे महत्त्व प्राप्त करून दिले. असत्य भाषण, चहाडी, वल्गना, चौर्यकर्म, हिंसा, अनीती, दुसऱ्याचा द्रव्यापहार, दुराग्रह, अनिष्ट चिंतन इत्यादी पापे गंगेत स्नान केल्याने दूर होतात, अशी आपली समजूत आहे. ही गंगानदी भारताची वरदायिनी आहे. हिच्याबद्दल श्रीशंकराचार्य म्हणतात, 'देवी, तुझ्या जळाचं पान करून सर्व विषयांपासून मी अलिप्त झालो आहे. आता भगवंताचं पूजन करावं, अशी माझी इच्छा आहे. देवी, तू तापत्रयाचं निवारण करणारी आहेस.' आदिकवी वाल्मीकी म्हणतात, 'तुझ्यावरील तरंगांचं सौंदर्य अवलोकन करीत व तुझं जलपान करीत मी तुझ्याकाठी निवास करून राहावं. तुझं नाम स्मरीत असतानाच माझा देहपात व्हावा.'

गंगा नदीच्या माहात्म्यात सामाजिक व ऐतिहासिक महत्त्वही आहे. यात प्राचीन इश्वाकुवंशाचा इतिहास दृष्टीस पडतो. सगरराजाचे अनेक प्रजाजन पूर्वदेश काबीज करण्यासाठी गेले होते. त्यांचेच कार्य पुढे भगीरथाने गंगासागरावर विजयपताका रोवून पूर्ण केले. या सगरराजाची स्मृती म्हणून सगरास सागर व भगीरथाची आठवण म्हणून गंगेस भागीरथी अशी नावे मिळाली. पर्व

काळप्रसंगी गंगा व यमुना यांच्या संगमावर आजही लक्षावधी भारतीय स्नान करून पावन होतात. आपल्या मोरोपंत कवींनी गंगेसंबंधी म्हटले आहे,

**न उपासावे, गंगे देवि, तुला अंतरोनि पायसदा ।**
**तुकडा शिळाही खावा; जवळ करावे तुझेचि पाय सदा ।।**

ही गंगानदी भारतात पवित्र मानली जाते. स्नान करणाऱ्या मनुष्याला ही भगवंतापर्यंत घेऊन जाते. विष्णुपदी, त्रिपथगा, भागीरथी, जान्हवी अशी अनेक नावे या नदीस आहेत.हिमालयात गंगेचे भिन्न भिन्न प्रवाह दिसतात. सीता, अलकनंदा, वटोदका, नलिनी, सरस्वती, जंबूनदी, सिंधू अशा नावांनी गंगेचे प्रवाह ओळखले जातात. चक्षू, भद्रा अशीही नावे या नदीची सांगितली जातात. या गंगेचे माहात्म्य ऋग्वेदकाळापासून सांगितले जाते. विविध पुराणांनी हिचे महत्त्व गाइले आहे. श्रीकृष्णांनी गीतेत 'स्रोतसामस्मि जान्हवी' (१०.३१) म्हणून हिचा गौरव केला आहे. या गंगेवर अनेकांनी स्तोत्रे लिहून हिचे माहात्म्य वाढविले आहे. गंगापूजा, गंगाव्रत करून सर्व भारतीय या नदीची उपासना करतात जरी विविध कारणांनी आजकाल ही गंगानदी दूषित बनली असली तरी लोकांची हिच्यावरील श्रद्धा कमी झालेली नाही. गंगोत्रीपासून गंगासागरापर्यंतची यात्रा अजूनही मोठ्या हौसेने व श्रद्धेने लोक करतात. गंगालहरींचा प्रारंभीचा श्लोकच या श्रद्धेचे महत्त्व पटविणारा आहे. तो असा आहे;

**समृद्धं सौभाग्यं सकलवसुधायाः किमपि तन्- ।**
**महैश्वर्यं लीलाजनितजगतः खण्डपरशो : ।।**

**श्रुतीनां सर्वस्वं सुकृतमथ मूर्तं सुमनसां : ।**
**सुधासहोदरं ते सलिलमशिवं नः शमयतु ॥**

गंगादेवी, तुझे हे जल म्हणजे सर्व पृथ्वीचं जणू महासौभाग्य आहे. लीलेनं जलाची निर्मिती करणाऱ्या शंकरांचं हे महान ऐश्वर्यच आहे. वेदांचं सर्वस्व, देवांच्या पुण्याचं मूर्तिस्वरूप, अमृताचं सहोदर असं भावंड असणारं तुझं जल आमचं अशुभ नष्ट करो. याच भाविकतेने आपण गंगेत स्नान करतो. गंगेचे ध्यान करतो. पूजा करतो. आपल्या घरीही 'हर गंगे भागीरथी' म्हणून आपण स्नान करतो. स्नान करताना पाणी ज्या मोठ्या पसरट भांड्यात आपण घेतो त्यास गंगालय, गंगाळ, गंघाळ असेच नाव आहे. इतकी ही गंगा आपल्या जीवनात मुरून गेली आहे.

याच ज्येष्ठ मासात पौर्णिमेस कबीरजयंती असते. विख्यात संत, साक्षात्कारी पुरुष, धर्मसुधारक व हिंदुमुसलमानांना उपदेश करणारा म्हणून कबीरदासांचा लौकिक आहे. या कबीरांची जयंती उत्तर भारतात सर्वत्र साजरी होते. कबीरदासांचा पंथ आजही भारतात प्रसिद्ध आहे. स्वामी विवेकानंद याच महिन्यात ज्येष्ठ वद्य ६ रोजी, ४ जुलै १९०२ या दिवशी समाधिस्थ झाले. राजमाता जिजाबाई व झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची पुण्यतिथी याच महिन्यात येते. ज्येष्ठ शुद्ध ७ रोजी, १८ जून १८५८ ला १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात राणी लक्ष्मीबाईंनी आत्मार्पण केले. ज्येष्ठ व. ९ रोजी राजे शिवाजीमहाराज यांच्या मातोश्री जिजाबाईसाहेब यांचे निधन झाले. नासिकजवळ त्र्यंबकेश्वर येथे ज्ञानेश्वरांचे थोरले बंधू व गुरू श्रीनिवृत्तिनाथ यांनी ज्येष्ठ व. १२ रोजी समाधी घेतली. यांच्या समाधीनंतर संत नामदेवांनी उद्गार

काढले, 'लोपलासे भानु पडला अंधार। गेला योगेश्वर निवृत्तिराज.'

यानंतर आपल्या वर्षाचा चौथा महिना म्हणजे आषाढ होय. ग्रीष्मऋतूचा हा दुसरा महिना. आषाढालाच शुची असे दुसरेही नाव आहे. या मासाच्या पौर्णिमेच्या आगेमागे पूर्वाषाढा वा उत्तराषाढा नक्षत्र येते, म्हणून या महिन्यास आषाढ म्हणतात. या महिन्यात सूर्याचे संक्रमण सुरू होऊन दक्षिणायनास प्रारंभ होतो. या आषाढ महिन्यात एकभुक्त राहून उपासना केली तर मनुष्य धनधान्य व पुत्र यांनी संपन्न होतो. आषाढात वामनाच्या प्रीतीसाठी पादत्राणे, छत्री, मिठाचे आवळे यांचे दान करतात. आषाढ शु. २ या दिवशी पुष्यनक्षत्र असेल तर या दिवशी बलराम, कृष्ण व सुभद्रा यांचा रथोत्सव साजरा करतात. जगन्नाथपुरीस ही रथयात्रा अत्यंत शोभनीय व विख्यात अशी असते. महिषासुरमर्दिनीची पूजा, वरलक्ष्मीव्रत, विनायकपूजा, आषाढ अधिकमास असल्यास कोकिलाव्रत्त; इत्यादी व्रते या महिन्यात केली जातात.

## आषाढस्य प्रथम दिवसे

भारतास फार मोठी कीर्ती प्राप्त करून देणाऱ्या महाकवी कालिदासाचा स्मृतिदिन याच 'आषाढस्य प्रथम दिवसे' साजरा केला जातो. कालिदास हा एक थोर कवी, नाटककार असल्याने जयदेवकवीने त्यास 'कविकुलगुरू' अशी पदवी दिलेली आहे. कालिदासाचे काव्य म्हणजे मधुर रसाने थबथबलेली मंजिरीच, असे बाणकवीने म्हटले आहे. 'पृथ्वीवर राहून स्वर्गसुखाचा अनुभव घ्यायचा असेल तर शरद्ऋतूमधील चंद्रकिरणे, शर्करायुक्त दूध, तारुण्यातील नवाळी, कोमलांगी युवती व कालिदासाची कविता

यांचा आस्वाद घ्यावा.' अशी भारतीयांची श्रद्धा आहे. पाश्चात्य विद्वानांनीही भारतीय कालिदासाची मुक्त कंठाने स्तुती केली आहे. प्रसिद्ध जर्मन कवी गटे याने तर म्हटले आहे की, 'स्वर्ग व पृथ्वी यांचे मधुर मीलन जर कोठे पाहायचे असेल तर, तारुण्याची टवटवी व परिपक्वतेची फळे जर कोणास एकाच ठिकाणी बघायची असतील तर, मी शाकुंतलाकडे बोट दाखवीन.' महाकवी रवींद्रनाथ ठाकुरांनीही या कालिदासाचा मनापासून गौरव केला आहे. हा कालिदास माळव्यातील उज्जयिनीस राहात असे. तेथील देवीची उपासना करणारा कालिदास शिवभक्त होता. श्रुती, स्मृती, इतिहास, पुराणे, योग, सांख्यादी दर्शने, ज्योतिःशास्त्र, कामशास्त्र, वैद्यक, व्याकरण, अर्थशास्त्र, संगीत, चित्रकला; इत्यादी विषयांचा कालिदासाचा परिचय फार चांगला होता. तो वृत्तीने थोडा रंगेल वाटला तरी गृहस्थाश्रमाचा महिमा व पत्नीप्रेम यांना तो मानीत असे.

ऋतुसंहार, कुमारसंभव, मेघदूत इत्यादी काव्ये कालिदासाने लिहून भारतीय कवितेचे दालन समृद्ध केले आहे. रघुवंश हे कालिदासाचे एक उत्कृष्ट खंडकाव्य मानले जाते. 'उपमा कालिदासस्य' ही उक्ती सार्थ ठरेल अशी महती कालिदासाची आहे.शाकुंतल,मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय; ही त्याची प्रसिद्ध नाटके अजूनही रसिकाच्या मनास लुब्ध करणारी आहेत. कालिदासाच्या सुभाषितांवर तर असंख्य रसिक संतुष्ट झाले आहेत. अशा या महाकवीची स्मृती एखाद्या उत्सवासारखी आषाढाच्या पहिल्या दिवशी साजरी होते. नृत्य, संगीत, नाटक यांनी रसिक श्रोते संतुष्ट होतात.

## आषाढ शुद्ध एकादशी

महाराष्ट्रात एक गाजलेला यात्राउत्सव म्हणजे आषाढी एकादशीचा पंढरपूरचा सोहळा होय. या चारपाच दिवसांत पंढरपुरास चारपाच लाख लोकांचा मेळावा भरतो. आषाढ शु. एकादशीस शयनी एकादशीही म्हणतात. या एकादशीच्या उत्पत्तीची एक कथा आहे. कुंभ दैत्याचा पुत्र मृदुमान्य हा शंकरांच्या कृपेने अमर होऊन देवांना त्रास देऊ लागला. ब्रह्मदेवादी देव भिऊन गेले. त्यांनी त्रिकूटपर्वतावर धात्री नावाच्या झाडाखाली एका गुहेचा आश्रय घेतला. तेथे त्यांना उपोषण घडले. त्या ठिकाणी त्यांच्या श्वासापासून एक दिव्य शक्ती निर्माण झाली. तिने दाराशी बसून राहिलेल्या मृदुमान्य दैत्याचा नाश केला. या शक्तीचे नाव एकादशी होते. हिच्यात सर्व देवांचे तेज एकवटलेले असल्यामुळे ती शिव व विष्णू या दोघांनाही प्रिय झाली.

या दिवशी विष्णू शयन करतात. याच दिवशी चातुर्मासाचा प्रारंभ होतो. श्रीविष्णूंनाच नारायण, वासुदेव अशी नावे असून या वैष्णवधर्माचा प्रसार पुढे फार झाला. यातून पुढे भगवद्धर्म, वारकरीपंथ उदयास आला. शूद्र, अतिशूद्र यांना या भक्तिमार्गात स्थान मिळाले. ' उंच नीच कांही नेणे हा भगवंत ' असे तत्त्वज्ञान रूढ झाले. या भागवतधर्माने फार मोलाचे कार्य महाराष्ट्रात केले. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, बहिणाबाई, निळोबा यांनी या पंथाची जोपासना करून नामसंकीर्तनाचा मार्ग सर्वांना खुला केला. बहिणाबाईने हे कर्तृत्व एका लहानशा अभंगात उभे केले आहे. तो अभंग असा,

**संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।**
**ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ।।**
**नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ।।**
**जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।**
**तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।**
**बहेणी फडकती ध्वजा । निरूपण केलें वोजा ।।**

आज महाराष्ट्रात पंढरपूर हे एक भूवैकुंठच निर्माण झाले आहे. हजारो वारकऱ्यांबरोबर आळंदीच्या ज्ञानेश्वरांची, देहूच्या तुकोबा-रायांची पालखी मोठ्या थाटाने पंढरपुरास जाते. अशाच पालख्या एकनाथ, निवृत्तिनाथ, मुक्ताबाई, मत्स्येंद्रनाथ, सोपानदेव, सावता-माळी इत्यादींच्याही मोठ्या थाटाने व उत्साहाने पंढरपुरास येतात. लक्षावधी वारकरी एकादशीच्या आधी एक दिवस पंढर-पुरास येतात. चंद्रभागेत स्नान करतात. खांद्यावर पताका, गळ्यात तुळशीची माळ, मुखी विठ्ठलनाम यांत ते रंगून जातात. स्नान झाल्यावर वारकरी चंद्रभागेच्या काठावरील पुंडलीकाचे दर्शन घेतात. नंतर चोखा महार, नामदेव यांचे दर्शन घेऊन विटेवर, कमरेवर दोनही हात ठेवून उभा असलेला विठ्ठल वा पांडुरंग डोळे भरून पाहातात. त्याच्या समचरणांवर डोके ठेवितात. कथाकीर्तने ऐकतात. एकमेकांना अबीरबुक्का लावतात. पंढरपूरच्या या यात्रेची महती अलीकडे फारच वाढलेली आहे.

'खेळ मांडियेला वाळवंटीं घाई। नाचती वैष्णव भाई रे' असेच दृश्य सर्वत्र दिसते. वारीसाठी पायीच यात्रा बहुतेक वारकरी करतात. पण विठ्ठलाच्या नामाच्या गजरात त्यांना शीण वाटत नाही. चार-चार तास वारीत उभे राहून ते विठ्ठलाचे दर्शन उत्कट

भावनेने घेतात. त्याला पाहिले की, त्यांचे दुःख दूर होते. त्यांच्या मनास टवटवी येते.

ज्ञानेश्वरमहाराज (आळंदी), निवृत्तिनाथ (त्र्यंबकेश्वर), सोपानदेव (सासवड), मुक्ताबाई (मेहूण), विसोबा खेचर (औंढ्या नागनाथ), गोरा कुंभार (तेर), सांवतामाळी (अरण-भेंडी), जगमित्र नागा (परळी वैजनाथ), कूर्मदास (लऊळ), चांगदेव (पुणतांबे), भानुदास (पैठण), एकनाथ (पैठण), राघव चैतन्य (आळंदगुंजोटी), केशवचैतन्य (ओतूर), बाबाजी चैतन्य (मन्याहाळ), तुकाराममहाराज (देहू), निळोबाराय (पिंपळनेर) बोधलेबोवा (धामणगाव), शंकरस्वामी (शिऊर), मुकुंदराय (आंबेजोगाई), जोगा परमानंद (बार्शी); अशा अनेक संतांच्या पालख्या असंख्य भक्तांबरोबर पंढरीस येतात व नामसंकीर्तनात तल्लीन होतात. 'माझे मनींची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी' अशीच आवड प्रत्येकाच्या मनात असते. 'आजि संसार सुफळ झाला गे माये। देखियेले पाय विठोबाचे' असा भाव ज्याच्या त्याच्या मुखावर असतो.

पंढरपुरास जाणारा हा पालखी-सोहळा दीड-दोनशे वर्षांपूर्वी श्रीहैबतरावबाबा आरफळकर यांनी सुरू केला. यापूर्वी वारीस जात असत. पण पालखीबरोबर थाटाने, भजन करीत करीत पंढरपुरास जाण्याची प्रथा हैबतरावबाबांनी सुरू केली. हैबतराव-बाबांपूर्वी पादुका गळ्यात घालूनच नेत असत. पण त्यांनी पालखीतून पादुका नेण्याची व्यवस्था चालू केली. घोडे, तंबू, रथ असा लवाजमाही नंतर वाढला. भजनी दिंड्यांची संख्या वाढली. वेळापत्रकाप्रमाणे शिस्तीने पालख्यांची वाटचाल सुरू झाली. रोज प्रवचने, कीर्तने, नामस्मरण यांत वारकरी रंगून गेले. आळंदी—

पुणे– सासवड– जेजुरी– वाल्हे– नीरा– लोणंद– तरडगाव– फलटण– बरड– नातेपुते– माळशिरस– वेळापूर– तोंडलेबोंडले– शेगांव– वाखरी– पंढरपूर; असा साधारण कार्यक्रम श्रीज्ञानेश्वरांच्या पालखीचा असतो. तोंडलेबोंडलेच्या आधी ठाकुरबाबांच्या मंदिराजवळ गोल रंगण होते. शेगावलाही रंगण होते. भारुडांचे कार्यक्रमही होत असतात.

पंढरपूर गाव व वाळवंटाचा सर्व भाग वारकऱ्यांनी फुलून गेलेला असतो. अनेक मठ, धर्मशाळा, विश्रांतिस्थाने भरून गेलेली असतात. काही वारकरी पाले, राहुटया ठोकून निवास करतात. अबीर, बुक्का, कुंकू, तुळशीच्या माळा, मिठाई, घोंगडया, खेळणी इत्यादींची असंख्य दुकाने नटलेली असतात. वारकरी सर्व प्रकारचा त्रास सहन करून पांडुरंगाच्या प्रेमात रंगलेले असतात. आषाढी एकादशीस पंढरपुरास हा सोहळा डोळयांचे पारणे फेडील असा भरतो. वद्य एकादशीस आळंदीस यात्रा भरते. कार्तिक वद्य एकादशीपासून त्रयोदशीपर्यंत आळंदीचा सोहळाही पाहाण्यासारखा असतो. कार्तिक शुद्ध एकादशीसही पंढरपुरास मोठी यात्रा भरते. आळंदी, पंढरपूर, पैठण, त्र्यंबकेश्वर; अशी काही यात्रेची ठिकाणे वारकऱ्यांना प्रिय असली तरी त्यांचे खरे प्रेम आळंदीवर व पंढरपुरावर आहे. पंढरपूर तर त्यांना माहेरच वाटते. कारण तेथे त्यांचा मायबाप पांडुरंग त्यांची वाट पाहात असतो. आणि ते ज्ञानेश्वरमाऊलीबरोबर त्याला भेटण्यासाठी निघालेले असतात. म्हणूनच एकनाथांनी म्हटले आहे,

**माझें माहेर पंढरी । आहे भीवरेचे तीरीं ।।१।।**
**बाप आणि आई । माझी विठ्ठल रखुमाई ।।२।।**

**पुंडलिक आहे बंधू । त्याची ख्याती काय सांगू ?**
**॥३॥**
**माझी बहीण चंद्रभागा । करीतसे पापभंगा ॥४॥**
**एका जनार्दनी शरण । करी माहेरची आठवण**
**॥५॥**

## टिळक-पुण्यतिथी

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा जन्मदिवस व त्यांची पुण्यतिथी याच महिन्यात येतात. आषाढ व. ६ हा टिळकांचा जन्मदिवस. लोकमान्य टिळक हे महान मुत्सद्दी, राजकारणी, थोर पंडित, वृत्तपत्रकार, भारतीय असंतोषाचे जनक. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' अशी घोषणा करणारे धैर्यमूर्ती असून त्यांचा जन्म कोकणात झाला. सन १८०० च्या सुमारास कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी सुरू केलेल्या न्यू इंग्लिश स्कूल-मध्ये टिळक व आगरकर हे दोन थोर नेते अध्यापक म्हणून आले. 'केसरी' व 'मराठा' ही दोन मराठी व इंग्रजी वृत्तपत्रे त्यांनी सुरू केली. स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीचा त्यांनी प्रसार केला. सर्व देशाला जागे केले. पार-तंत्र्यातील दु:खांची जाणीव करून दिली. सन १९०८ मध्ये त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला. त्यांना सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा झाली. याच बंदिवासात असताना त्यांनी मराठीत 'गीतारहस्य' या नावाचा एक अलौकिक ग्रंथ कर्म-योगाचा प्रसार करण्यासाठी लिहिला. वैदिक संस्कृती, प्राचीन वाङ्मय, गणितविद्या, कायदा इत्यादी अनेक विषयांचे ज्ञान त्यांना होते. 'ओरायन्' व 'आर्क्टिक होम इन दि वेदाज' हे त्यांचे इंग्रजी ग्रंथ सर्व जगात गाजले. 'केसरी'मधील अग्रलेख तर सर्व

मराठी वाचकांना प्रेरक ठरले. इंग्रज सरकार त्यामुळे भयभीत झाले.

परंतु लोकमान्य टिळकांच्या बाबतीत आषाढ शु. १५ हा दिवस अत्यंत महत्त्वाचा व दु:खाचा ठरला. १ ऑगस्ट १९२० ही तारीख या दिवशी होती. या दिवशी लोकमान्यांचा अंत मुंबईला झाला. १ ऑगस्ट हा टिळकांच्या पुण्यतिथीचा दिवस सर्व भारत-भर एखाद्या राष्ट्रीय उत्सवासारखा पाळून लोक त्यांच्या स्मृती-मधून देशप्रेमाची प्रेरणा घेतात. टिळक दिवंगत झाल्याची बातमी सर्वत्र समजताच सर्व महाराष्ट्रातील लोक मुंबईस आले. रवि-वारचा दिवस होता. दुपारी स्मशानयात्रा निघाली. प्रेतास खांदा देणाऱ्यांत महात्मा गांधी प्रमुख होते. जनसमुदाय फार मोठा होता. ‘ लोकमान्य टिळक महाराज की जय ’ अशा गर्जना होत होत्या. पावसाची जोरदार वृष्टी होत होती. भजनी दिंड्या यात्रेबरोबर होत्या. चौपाटीवर टिळकांचा देह चंदनकाष्ठांवर ठेवून त्याला अग्नी देण्यात आला. त्यावेळी ‘ संदेश ’ नावाचे एक वृत्तपत्र अच्युत बळवंत कोल्हटकर काढीत होते. त्यांनी त्या दिवशीच्या प्रसंगाचे वर्णन ‘ संदेश ’मध्ये केले ते असे :

‘ गेल्या चाळीस वर्षांत सूर्याने इतक्या येरझाऱ्या केल्या, वायू इतके वेळ वाहला, समुद्राला इतके वेळ भरती आली, तारे इतक्या वेळा चमकले, पण त्या प्रत्येक चमकण्याने, भ्रमणाने, लाटेने, पवनाने हेच तत्त्व पुन:पुन्हा प्रस्थापित केले आहे की, टिळक म्हणजेच महाराष्ट्र आणि महाराष्ट्र म्हणजेच टिळक ! ह्या चाळीस वर्षांतील एक कृती काढा, एक गोष्ट घ्या, एक वर्तमानपत्र वाचा, एक राजकारण उलगडा, त्या शोधकांना काय आढळेल ? १८८० मध्ये टिळक महाराष्ट्राच्या राजकीय पटांगणात उतरले

आणि १९२० मध्ये ते महाराष्ट्र सोडून गेले. इतक्या अवधीतच एकच नाव भरलेले आहे आणि ते कोणते ? तर बाळ 'गंगाधर टिळक !'

अशी जादू लोकमान्य टिळकांच्या नावात अजूनही आहे. स्वराज्याचे सुराज्य कसे करावे, यासंबंधीही टिळकांनी अग्रलेखांतून मार्गदर्शन केले आहे. राष्ट्रीय समस्यांचा विचार करण्यासाठी आजही विचारवंतांना टिळकपुण्यतिथी हा पर्वणीचा दिवस वाटतो. भारतातील सर्व प्रमुख शहरांतून या पुण्यतिथीचा उत्सव साजरा होतो. 'गीतारहस्य' ग्रंथाच्या आवृत्त्या लोकप्रिय होत आहेत.

# ४) नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, गणपतीउत्सव

## श्रावण व भाद्रपद

यानंतर आपल्या कालगणनेनुसार पाचवा महिना श्रावणाचा येतो. श्रावण व भाद्रपद हे पावसाचे महिने असले तरी सणांनी, उत्सवांनी समृद्ध आहेत. या श्रावणाच्या पौर्णिमेच्या आसपास श्रवणनक्षत्र असल्याने याला श्रावण हे नाव मिळाले. या महिन्यात धार्मिक व्रते वा कृत्येही भरपूर सांगितली आहेत. बाहेर पाऊस, जीवन साधेसुधे, रिकामा वेळ कसा जावा ? या विचारातूनही ही

धर्मकृत्ये आलेली असावीत. दर सोमवारी शिवामूठ व नक्तव्रत, मंगळवारी नवीन लग्न झालेल्या मुलींची मंगळागौर, शुक्रवारी लक्ष्मीची पूजा व सुवासिनींना हळदीकुंकू, शनिवारी मुंज्या मुलाला घरी बोलावून त्याला स्नान घालणे, भोजन देणे, याच दिवशी शनीला तेल देणे, रविवारी आदित्याची पूजा, आणि या सर्वांच्या मनोरंजक कहाण्या यांनी हा श्रावण महिना समृद्ध झालेला असतो.

शुद्ध पंचमीला नागपंचमीचा सण येतो. पौर्णिमेस नारळी-पौर्णिमा व समुद्रपूजन असते. याच दिवशी बहीण भावाच्या हातात राखी बांधून त्याच्याकडून रक्षणाची अपेक्षा करते. हीच पौर्णिमा पोवतीपौर्मिणा म्हणूनही ओळखली जाते. या दिवशी सुताची पोवती करून विष्णू, शिव, सूर्य इत्यादींना अर्पण करून मग ती स्त्रीपुरुष घरात एकमेकांना बांधतात. याच दिवशी ब्राह्मण लोक उपाकर्म वा श्रावणी करून नवीन यज्ञोपवीत धारण करतात. श्रावण वद्य अष्टमीस तर सर्व भारतात कृष्णजन्माचा उत्साह



मोठ्या आनंदाने साजरा करतात. उत्तरेत विक्रम संवताच्या काल-गणनेनुसार हा दिवस भाद्रपद वद्य अष्टमी असतो. या महिन्याच्या अमावस्येस पिठोरी अमावस्या म्हणतात. याच दिवशी काही लोक पोवळा वा बेंदूर नावाचा सण करून बैलांना शृंगारतात. त्यांची पूजा करतात, मिरवणूक काढतात.

उत्तरभारतात तर या महिन्यात झुलनयात्रा, रक्षाबंधन, जन्माष्टमी, नंदोत्सव इत्यादी उत्सव महत्त्वाचे मानतात. पौर्णिमेस राधा व कृष्ण यांना झोपाळ्यावर बसवून झोके देतात. स्त्रिया त्यांची गीते गातात. गीते, वाद्ये, नृत्ये यांची लयलूट असते. राधा-कृष्णांची पूजा होते. कथाकीर्तने होतात. कृष्णचरित्रातील प्रसंगां-वर नाट्यप्रसंग होतात. नंदास पुत्र झाला असे समजून गीते, नृत्य नाट्य यांनी मोठा उत्सव साजरा करतात. चातुर्मासात तर श्रावण महिना श्रेष्ठ मानला जातो. या महिन्यात नाना प्रकारची दाने होतात. सृष्टी सर्वत्र हिरवीगार बनून नटलेली असते. जाईजुई, सोनचाफा, गुलाब इत्यादी फुलांना बहर आलेला असतो. त्यांचा सुवास सर्वत्र दरवळतो.

यानंतरचा सहावा महिना भाद्रपद असाच सणांनी व उत्सवांनी भरगच्च असतो. या महिन्याच्या पौर्णिमेच्या आसपास पूर्वाभाद्र-पदा नक्षत्र असते, म्हणून याचे नाव भाद्रपद झाले. या महिन्याचे दुसरे नाव नभस्य होय. याही महिन्यात अनेक व्रते, सण यांची गर्दी असते. शुद्ध तृतीयेस हरितालिकाव्रत येते. या दिवशी स्त्रिया पार्वतीची पूजा करतात. शुद्ध चतुर्थीस गणेशचतुर्थी असते. या दिवशी गणपतीची स्थापना वैयक्तिक व सार्वजनिक रीतीने सर्वत्र केली जाते. पंचमीस ऋषिपंचमी असे नाव असून या दिवशी स्त्रिया सप्तर्षींची पूजा करतात. या दिवशी बैलांच्या श्रमाचे पदार्थ

बायका खात नाहीत. षष्ठीला सूर्यपूजन करून कार्तिकस्वामीचे दर्शन घेतात. गणपतीबरोबरच घरी गौरींचे आगमन होते. त्यांचाही थाटमाट मोठाच असतो. भाद्रपदाच्या कृष्णपक्षात पितृकार्यासाठी कृत्ये करतात. पितरांसाठी महालय श्राद्ध करतात. षष्ठीला चंद्रपूजा करतात. नवमी अविधवा नवमी म्हणून प्रसिद्ध असून या दिवशी सुवासिनी मृत झाली असेल तर तिचे श्राद्ध करतात. अशी अनेक व्रते व वैकल्ये श्रावण व भाद्रपद या मासांत येतात व ती आजही अनेक ठिकाणी श्रद्धेने केली जातात.

## अशी ही नागपंचमी

श्रावण शुद्ध पंचमीस नागपंचमीचा सण येतो. या दिवशी घरात पाटावर हळदीने, रक्तचंदनाने नागाचे चित्र काढतात. मातीचे केलेले नागही पाटावर मांडतात. त्यांची पूजा करून दूध व लाह्या यांचा त्यांना नैवेद्य दाखविला जातो. नागपंचमीस काहीही चिरू नये, नागास दुखापत होते अशी श्रद्धा आहे. कापू नये, तळू-नये. दिंड, मोदक यांसारखे उकडलेले पदार्थ मात्र चालतात.

नागपंचमीच्या दिवशी दुपारी गारुडी पेटाऱ्यात खरेखुरे नाग घेऊन पुंगी वाजवीत घरी येतात. लहान मुलांना या नागदेवाची गंमत वाटते. या खऱ्या नागाचीही पूजा करून त्याला नैवेद्य अर्पण करतात. दूध देतात. सायंकाळी मुली व बायका गावाबाहेर जाऊन खेळ खेळतात. फेर धरतात. झिम्मा, फुगड्या, झोके, फेर, गाणी, नृत्ये यांत त्या रंगून जातात. यांतील एक गाणे असे आहे;

**चल ग सये वारूळाला । नागोबाला पूजायला ।।**
**हळदकुंकू वहायाला । ताज्या लाह्या वेचायला ।।**




**जमुनिया साऱ्या जणी । जाऊ बाई न्हवणा ।।**
**तिथं पाय ठेवूं बाई । तिथं उठल् दवणा ।।**

या नागपंचमीच्या सणास अखिल भारतीय महत्त्व आहे. त्याला सामाजिक महत्त्व आहे. नागांचा वा सर्पांचाही शेतकऱ्यांना उपयोग होतो, ही भावना त्यांच्या पूजेच्या मागे आहे. बंगाल व छोटानागपूर या देशांत या दिवशी सर्पराज्ञी मनसादेवीची पूजा करतात. राजस्थानात पीपा, तेजा इत्यादी पौराणिक नागांच्या कथा व पूजा प्रसिद्ध आहेत. बिहारमध्ये काही वर्गातील स्त्रिया स्वत:ला नागपत्न्या समजून नागांची गीते गातात. कर्नाटकात

नागांना गूळपापडीचे लाडू नैवेद्य म्हणून दाखवितात. गुजराथमध्ये नागमूर्तीपुढे तुपाचा दिवा लावतात. उत्तरप्रदेशात पुरुष दुधाची भांडी गावाबाहेर जाऊन नागांच्या वारुळांत रिकामी करतात. काशीला 'नागलो, भाई नागला! छोटे गुरू का, बडे गुरू का, नागलो, भाई नागलो' अशा ओरडण्याने मुलांच्या मिरवणुका निघतात. नागकुव्याचे पाणी लोक नागतीर्थ म्हणून पितात. पूर्वी नागपंचमीच्या दिवशी नृत्य, गाणी, नाटके होत असत. श्रीकृष्णाने कालियामर्दन केले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता, असे मानले आहे.

आपल्या भारतीय संस्कृतीत नाग व नागपूजा यांना विशेष महत्त्व आहे. 'सर्वां भूतीं भगवद्‌भाव' या सूत्राचा अनुभवही नागपूजेत येतो. नागात देवत्व कल्पून त्याची पूजा सुरू झाली असावी. संपत्तीचा, धनाचा रक्षणकर्ता म्हणूनही नागास महत्त्व आहे. नागाची बहीण मनसा. हिच्या भक्तांना नागाचे विष बाधत नाही अशी समजूत आहे. तिचे नावही 'विषहरा' असे आहे. महाभारतकाळी नाग ही एक मनुष्यजात असावी. आर्य व नाग यांच्यांत युद्धे होत असावीत. ज्याची आई नागकन्या व पिता आर्य असलेल्या आस्तिकऋषींनी, नागांचा व आर्यांचा संघर्ष मिटविला म्हणून आर्यांनी नागपूजा स्वीकारली. म्हणूनच हा नागपंचमीचा सण सुरू झाला असावा. नाग व नागपंचमी यांच्यासंबंधी अनेक कथा, कविता लोकसंस्कृतीत रुजल्या आहेत. काही ओव्या पाहाण्यासारख्या आहेत. नागपंचमीच्या दोन कहाण्याही पुढे दिलेल्या आहेत. नागपंचमीच्या ओव्या अशा :

**नागपंचमीला । नागा चंदनाचे गंध ।**
**तुटती भवबंध । पुजणाऱ्यांचे ।।**
**नागपंचमीला । नागाला घाला दूध ।**
**होईल बुद्धी शुद्ध । नागकृपें ।।**
**नागपंचमीला । नको चिरू भाजीपाला ।**
**दया शिकवू हाताला । आज सये ।।**

## नागपंचमीच्या दोन कहाण्या

१) ऐका नागोबा देवा, तुमची कहाणी. आटपाट नगर होते. तिथे एक ब्राह्मण होता. त्या ब्राह्मणाला पाच सुना होत्या. चातुर्मासात श्रावणमास आला आहे, नागपंचमीचा दिवस आहे, कोणी आपल्या आजोळी, कोणी पंजोळी, कोणी माहेरी अशा सर्व सुना गेल्या आहेत. सर्वांत धाकटी सून होती. तिच्या माहेरचं कोणीच नव्हतं. तेव्हा ती जरा खिन्न झाली व मनात माझा सर्वसंबंधी नागोबा देव आहे, असे समजून नागोबा मला माहेराहून न्यायला येईल, असे म्हणू लागली. इतक्यात काय झालं ? शेषभगवानास तिची करुणा आली. त्याने ब्राह्मणाचा वेष घेतला व त्या मुलीस नेण्याकरिता आला. ब्राह्मण विचारात पडला, हा इतके दिवस कुठे लपून राहिला ? व आताच कोठून आला ? पुढे त्याने मुलीला सांगितले. तिनेही हाच माझा मामा असे सांगितले. ब्राह्मणाने तिची रवानगी केली. त्या वेषधारी मामाने तिला आपल्या वारुळात नेलं. खरी हकीगत तिला सांगितली. फणीवर बसवून आपल्या बिळात घेऊन गेला. आपल्या बायका-मुलांना ताकीद दिली की हिला कोणी चावू नका.

एके दिवशी नागाची नागीण बाळंत होऊ लागली, तेव्हा हिला हातात दिवा धरायला सांगितला. पुढे ती व्याली. तिची पिलं वळवळ करू लागली. ही मुलगी भिऊन गेली. हातातला दिवा खाली पडला. पोरांची शेपटे भाजली. नागीण रागावली व तिने सर्व हकीकत नवऱ्याला सांगितली. तो म्हणाला, तिला लवकरच सासरी पोचवू. पुढे ते पूर्ववत् आनंदानं वागू लागले. एके दिवशी मुलीस अपार संपत्ती दिली. आपण मनुष्यदेह धारण करून तिला सासरी पोचती केली. नागाची पोरं मोठी झाली. आपल्या आई-पाशी चौकशी केली. आमची शेपटं कशानं तुटली ? तिने मुलीची गोष्ट सांगितली, त्यांस फार राग आला. तिचा सूड घ्यावा म्हणून ते तिच्या घरी आले, तो नागपंचमीचा दिवस. हिनं आपली पुष्कळ वेळ भावांची वाट पाहिली. ते येत नाहीत म्हणून पाटावर व भिंतीवर नागांची चित्रं काढली, त्यांची पूजा केली. जवळ नागाणे, लाह्या, दूध वगैरे ठेवलं. उकडीचा नैवेद्य दाखविला. हा सर्व प्रकार नागाची पिलं पाहत आहेत. सरते-शेवटी तिने देवाची प्रार्थना केली. 'जय नागोबा देवा, जिथे माझे भाऊ लांडोबा, पुंडोबा असतील तिथे खुशाल असोत,' असं म्हणून नमस्कार केला. इकडे सर्व प्रकार ह्यांनी पाहून मनातील सर्व राग घालविला. मनात तिजविषयी दया आली. पुढं त्या दिवशी तिथे वस्ती केली. दूध पाणी ठेवतात त्यात पहाटेस एक नवरत्नांचा हार ठेवून आपण निघून गेले. दुसऱ्या दिवशी हार उचलून गळ्यात घातला. तर जसा तिला नागोबा प्रसन्न झाला, तसा तुम्हां आम्हां होवो. ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

२) आटपाट नगर होते. तिथे एक शेतकरी होता. त्याच्या शेतात एक नागाचे वारुळ होते. श्रावणमास आला आहे. नाग-

पंचमीचा दिवस आहे. शेतकरी आपला नित्याप्रमाणे नांगर घेऊन शेतात गेला. नांगरता नांगरता काय झाले ? वारुळात जी नागांची नागकुळे होती, त्यांना नांगराचा फाळ लागला. लवकरच ती मेली. काही वेळाने नागीण आली. आपले वारुळ पाहू लागली. तो तिथे वारुळ नाही आणि पिलेही नाहीत. इकडे-तिकडे पाहू लागली, तेव्हा नांगर रक्ताने भरलेला दिसला. तसे तिच्या मनात आले, ह्याच्या नांगरानं माझी पिले मेली. तो रोष मनात ठेविला. शेतकऱ्याचा निर्वंश करावा, असे मनात आणले. फोफावतच शेतकऱ्याचे घरी गेली. मुलाबाळांना, लेकीसुनांना आणि शेतकऱ्याला व त्याच्या बायकोला दंश केला त्याबरोबर सर्वजण मरून पडली.

पुढे तिला असे समजले की, ह्यांची एक मुलगी परगावी आहे. तिला जाऊन दंश करावा म्हणून निघाली. ज्या गावी मुलगी दिली होती त्या ठिकाणी आली. तो त्या घरी बाईने पाटावर नागनागीण, नऊ नागकुळं काढली आहेत, त्यांची पूजा केली आहे. दूधाचा नैवेद्य दाखविला आहे. नागाला लाह्या, दूर्वा वगैरे वाहिल्या आहेत. मोठ्या आनंदाने पूजा करून प्रार्थना करते आहे. तो ही नागीण तिथे पोहचली. पूजा पाहून संतुष्ट झाली. दूध पिऊन समाधान पावली. चंदनात आनंदाने लोळली. इकडे हिची प्रार्थना आपली डोळे मिटून चाललीच आहे. इतक्यात नागीण उभी राहिली, तिला म्हणू लागली, बाई बाई, तू कोण आहेस ? तुझे आई, बाप कुठे आहेत ? इतके म्हटल्यावर तिने डोळे उघडले. पाहाते तो प्रत्यक्ष नागीण दृष्टीस पडली. बाई बिचारी भिऊ लागली. नागीण म्हणाली, ‘ भिऊ नको, घाबरू नको, विचारल्या प्रश्नाचे उत्तर दे.’ तिने आपली सर्व हकीगत सांगितली. ती ऐकून नागिणीला वाईट वाटले. ती मनात म्हणाली, ही आपल्याला

इतक्या भक्तीने पूजते आहे, आपले व्रत पाळते आहे, आपण हिच्या बापाचा निर्वंश करण्याचं मनात आणलं आहे हे चांगलं नाही. असे म्हणून नागिणीने तिला बापाची हकीगत सांगितली. तिने ती ऐकली. वाईट वाटले. तिने आईबाप जिवंत होण्याचा उपाय विचारला. तिने तिला अमृत दिले. ते घेऊन त्याच पावली ती माहेरी आली. सगळ्या माणसांच्या तोंडात अमृत घातले. सगळी माणसे जिवंत झाली. सगळ्यांना आनंद झाला.

बापाला तिने झालेली सगळी हकीकत सांगितली. तेव्हा बापाने विचारले, 'हे व्रत कसे पाळावे ?' मुलीने व्रताचा सगळा विधी सांगितला व शेवटी सांगितले, 'इतके काही झाले नाही तर निदान इतके तरी पाळावे. नागपंचमीचे दिवशी जमीन खणू नये, भाज्या चिरू नयेत, तव्यावर शिजवू नये, तळलेले खाऊ नये, नागोबाला नमस्कार करावा, असे सांगितले. तेव्हापासून तो नागपंचमी पाळू लागला. जशी नागीण तिला प्रसन्न झाली तशी तुम्हां आम्हां होवो. ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

## नारळीपौर्णिमा व रक्षाबंधन

श्रावणातील पौर्णिमा हीस नारळीपौर्णिमा या नावाने ओळखतात. जोराचा पावसाळा आता थोडा सौम्य झालेला असल्याने वरुण देवतेसाठी, वर्षाऋतूत खवळलेला समुद्र शांत व्हावा म्हणून समुद्राची पूजा करून त्याला नारळ अर्पण करण्यात येतो. परदेशगमन निषिद्ध मानणारे भारतीय या दिवसापासून परदेशगमनाचे बेत रचीत असत. पूर्वकाली भारतीयांनी समुद्राच्या मार्गानेच सर्व जगात आपल्या संस्कृतीचा प्रसार केला आहे. पाव-

साचा जोर कमी झाल्यामुळे समुद्राचा धोका कमी झालेला असतो. समुद्रावर सत्ता गाजविण्यासाठी सागराची पूजा करण्याची प्रथा सुरू झाली. रामायण, बृहत्संहिता, बौद्ध जातके, रत्नावली, दशकुमार इत्यादी ग्रंथांवरून भारतीयांचा सागरविक्रम ध्यानात येतो. वैदिककाळी सर्व पृथ्वी वेदीप्रमाणे पवित्र मानण्यात येई. नौकाबंधनाचा विचार 'युक्तिकल्पतरू' या ग्रंथात झालेला आहे. ब्रह्मदेश, सयाम, मलाया, बोर्निओ, सुमात्रा, जावा, फिलिपाईन्स बेटे, जपान, मंगोलिया, चीन, दक्षिण व मध्य अमेरिका, आफ्रिकेचा पूर्व किनारा इत्यादी देशांत प्राचीन काळी भारतीयांनी



प्रवास केला तो सागरपृष्ठावरूनच. याच दृष्टीने नारळी पौर्णिमेस महत्त्व आहे.

याच दिवशी पावते वा पोवते धारण करण्याचा एक विधी असतो. नंतर याच विधीस रक्षाबंधन असे नाव मिळाले. शत्रूच्या गोटात जाऊन रजपूत स्त्रिया आपल्या पतीविरुद्ध लढू पाहाणाऱ्या शत्रूच्या हातात राखी बांधून अभय मिळवू लागल्या. बहिणीचे नाते निर्माण करू लागल्या. उत्तर हिंदुस्थानातील ही प्रथा आता महाराष्ट्रातही सर्वत्र रूढ झालेली दिसते. निरनिराळ्या आकारांच्या व रंगांच्या सुंदर राख्या नारळीपौर्णिमेच्या दिवशी बाजारात दिसू लागतात. समाजातील ऐक्य, बंधुभाव, मैत्री यांचे प्रतीक म्हणून रक्षाबंधनाच्या या विधीस महत्त्व असते.

फार पूर्वी केव्हा तरी राजास राखी बांधण्याची प्रथा होती. श्रावणी पौर्णिमेस सूर्योदयास स्नान करावे. संध्या तर्पण करून दुपारच्या वेळी राखी तयार करावी. तांदूळ, सोने, पांढऱ्या मोहऱ्या या एकत्र करून त्यांची पुरचुंडी बांधली की राखी तयार होत असे. तिची पूजा करून, खालील मंत्र म्हणून राखी बांधीत.

**येन बद्धोबली राजा दानवेन्द्रो महाबलः ।**
**तेन त्वामपि बध्नामि रक्षे मा चल मा चल ।।**

महाबली दानवेन्द्रबली राजा जिने बद्ध झाला, त्या राखीने मी तुलाही बांधतो. राखी, तू चलित होऊ नकोस. पुढे भावास बहिणीने राखी बांधण्याची पद्धत सुरू झाली.

### कृष्णजयंतीचा उत्सव

कृष्णाष्टमी, गोकुळाष्टमी, जन्माष्टमी इत्यादी नावांनी उत्तर

भारतात सर्वत्र श्रीकृष्णाच्या जन्माचा उत्सव साजरा केला जातो. श्रीकृष्ण हा आपल्या दहा अवतारांतील आठवा असून तो अनेक कारणांमुळे अत्यंत लोकप्रिय झाला आहे. बालकृष्णाच्या खोड्या, गोकुळातील त्याच्या लीला, गोपींशी क्रीडा, कंसादिकांचा त्याने केलेला वध, द्वारकेची निर्मिती, पांडवांचा सखा, भगवद्गीतेचे कथन, मुत्सद्दी, राजकारणी, तत्त्वज्ञ, कलाप्रियता अशा अनेक कारणांनी श्रीकृष्णास भारतीय जीवनात एक अनन्यसाधारण महत्त्व आलेले आहे.

श्रावण वद्य अष्टमीस मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर मथुरेस कंसमामाच्या कारागृहात श्रीकृष्णाचा जन्म देवकीच्या पोटी झाला. वसुदेव त्याचे वडील. या दिवशी जन्माष्टमीचे व्रत घेतात. सप्तमीस एकभुक्त राहून, अष्टमीस व्रतस्थ राहून देवकी व कृष्ण यांचे पूजन करावे. यशोदा, तिची कन्या, वसुदेव, देवकी, नंद यांच्यामध्ये कृष्णमूर्ती स्थापन करून 'श्रीकृष्णप्रीत्यर्थं सपरिवार



श्रीकृष्णपूजां करिष्ये ' असा मंत्र म्हणून श्रीकृष्णाची षोडशोपचारे पूजा करतात. कृष्णाष्टमीचा उत्सव सर्व भारतात अत्यंत उत्साहाने साजरा करतात. गोकुळ, मथुरा, वृंदावन, द्वारका, जगन्नाथपुरी इत्यादी कृष्णक्षेत्री तर थाट असतो. दीपाराधना, पालखी, आदंलनोत्सव, कृष्णलीला, रासलीला, जन्मोत्सव, भागवतकथावाचन, श्रवण, कीर्तन, भजन, नृत्य, टिपऱ्या इत्यादींनी सर्व जीवन कृष्णमय बनून जाते. महाराष्ट्रात तर दहीहंडीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात केला जातो. ' गोविंदा आला रे आला, गोकुळात आनंद झाला,' असा सर्वत्र जल्लोष असतो. काल्याची कीर्तने होतात. प्रसाद वाटला जातो. आनंदाने नाचत, गाजत लोक रस्तोरस्ती ' गोविंदा 'चा घोष करीत हिंडतात.

श्रीकृष्ण हा तसा पाहिला तर बहुजन समाजाचा देव. कारागृहात जन्म, गोकुळात गवळ्यांच्या पोरांत बालपण, दुष्टांचा नाश व सज्जनांचे रक्षण, गोपींची गाऱ्हाणी, त्यांनी केलेला विलाप, कृष्णाचे राजकारण, मुत्सद्दीपणा, तत्त्वज्ञान, भक्तिमार्ग इत्यादी विविध अंगांनी श्रीकृष्णचरित्र नटलेले आहे. त्याच्या बाललीला, त्याच्या खोड्या रोज आपल्या घरी आपल्या मुलांच्या रूपाने आपणांस दिसतात. श्रीकृष्ण भगवान म्हणून ओळखला जात असला तरी त्याच्या साध्यासुध्या गोड बालक्रीडा आपल्या मनास अजूनही संतुष्ट करतात. नृत्य, संगीत, नाट्य, काव्य, चित्रकारी इत्यादी ललित कलांतून कृष्णकथा आज सर्वसामान्य लोकांच्या मनावर चांगलीच बिंबलेली आहे. कृष्ण, राधा, रुक्मिणी, सत्यभामा, अर्जुन, उद्धव, यशोदा, नंद, वसुदेव, देवकी, अक्रूर इत्यादी मंडळी आपल्या रोजच्या परिचयाची वाटतात. मराठीतील व इतर प्रांतिक भाषांतील कवींनी कृष्णलीलांचे अवीट असे वर्णन

केले आहे. वेणुसुधा नावाच्या एका काव्यात वामनपंडितांनी कृष्णाचा मुरलीध्वनी, तो ऐकून गोपगोपींच्या मनाची झालेली अवस्था, धेनूंची व वासरांची तगमग इत्यादींचे सुंदर वर्णन वामनांनी केले आहे. ते म्हणतात;

अंग वक्र अधरीं धरी पावा ।
गोपवेष हरि तोचि जपावा ।।
वाम बाहुवरि गालहि डावा ।
तो ठसा स्वहृदयांत पडावा ।।
वेणुध्वनी तो सुरगायकांनी ।
त्यांच्या विमानांतहि बायकांनी ।
आश्चर्य कानीं पडताचि केलें ।
न तृप्त ज्यांचें मन हें भुकेलें ।।
मोहती व्रजपशू मृग-गाई ।
आमुचें नवल काय अगाई ।।
स्तब्ध होति लिखिते जसिं चित्रें ।
वेणुच्या ध्वनिरसेंचि विचित्रें ।।
मातृस्तनींचा रस आननांत ।
तो होय वेणुध्वनि काननांत ।।
गळे गिळेना पय वासुरांतें ।
आश्चर्य वाटे गगनीं सुरांतें ।।

शाखा.
क्र.

प्राचीन भारतीय काव्य प्रामुख्याने श्रीकृष्ण, गोपी, राधा यांच्या माहात्म्याने, भक्तिभावनेने भारावलेले आहे. ज्ञानेश्वर,

नामदेव, एकनाथ, तुकाराम, निळोबा, श्रीधर, वामनपंडित, मोरोपंत इत्यादी मराठी कवींनी श्रीकृष्णचरित्र अगदी तृप्त होऊन वर्णन केले आहे. जयदेव, विद्यापती, चंडीदास, श्रीचैतन्यदेव, सूरदास, मीराबाई इत्यादी अनेक उत्तर भारतीय कवी व दक्षिणेतील आळवार कवी यांनीही मुक्तकंठाने श्रीकृष्णलीला वर्णन केलेली आहे. मीराबाई ही एक कृष्णप्रेमात रंगलेली कवयित्री म्हणते :

**बसो मेरे नैननमें नंदलाल ।**
**मोहनी मूरत साँवरी सूरत नैना बने बिसाल ।**
**अधर-सुधा-रस मुरली राजति उर बैजंति माल ।।**
**छुद्र घंटिका कटितट सोभित नूपुर शब्द रसाळ ।**
**मीरा प्रभु संतत सुखदाई, भगत बछल गोपाळ ।।**

नंदलाला, तू माझ्या डोळ्यांतच वास्तव्य कर ना. तुझे रूप मोठे मोहक आहे. तुझा रंग सावळा आहे. तुझे नेत्र विशाल आहेत. तुझ्या मुरलीत तुझ्या ओठांतील सुधेचा रस आहे. तुझ्या कमरेला लहान लहान घुंगरू बांधले असून, त्यांचा मंजुळ ध्वनी येत आहे. मीरेचा प्रभू हा भक्तवत्सल असून सदैव सुख देणारा आहे हा गोपाळ.

अशा या गोपालकृष्णाचा उत्सव एखाद्या मोठ्या सणाप्रमाणे सर्वत्र साजरा होतो. प्रेम, आनंद, उत्साह यांना भरती येते. लहान मुलांपासून थोरांपासून सर्व जातिजमातींना या उत्सवात संतोष वाटतो. गोकुळातील बाललीला उत्सवात काल्याच्या कीर्तनात वर्णन करताना कथेकरी मोठ्या तन्मयतेने व भक्तिभावाने निरूपणासाठी अभंग घेतात :

**गोकुळींच्या सुखा । अंतपार नाहीं लेखा ।।१।।**
**बाळकृष्ण नंदाघरीं । आनंदल्या नर नारी ।।२।।**
**गुढिया तोरणे । करिती कथा गाती गाणें ।।३।।**
**तुका म्हणें छंदें । मन मोहिलें गोविंदें ।।४।।**

असा हा उत्सवांनी, सणांनी,उल्हासाने नटलेला श्रावण महिना. भाद्रपद मासही असाच गणेशोत्सवाने गाजत असतो. सार्वजनिक गणेशोत्सवाने सर्व महाराष्ट्र दुमदुमून जातो. आश्विनात दसरा व दिवाळी या मुख्य सणांची ओळख आपण करून घेऊच. श्रावण-भाद्रपदात जणू प्रत्येक दिवसाला व तिथीला वेगवेगळे महत्त्व असते. सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार, रविवार या दिवशी पूजा, व्रतविधी, कथानिरूपण यांची लयलूट असते. लोकमानसात रमलेल्या कथा व कहाण्या विपुल सांगितल्या जातात, ऐकल्या जातात.मागे दोन कहाण्या आपण नागपंचमीच्या पाहिल्या. आता एक तत्त्वदर्शी व आजच्या काळासही उद्बोधक अशी शुक्रवारची कहाणी पाहू.

## शुक्रवारची कहाणी

आटपाट नगर होते. तिथ एक गरीब ब्राह्मण राहत असे. तो दारिद्र्याने फार पिडला होता. त्याची बायको शेजारणीच्या घरी एके दिवशी बसायला गेली. आपल्या गरिबीचे गाऱ्हाणे गाइले. शेजारणीने तिला शुक्रवारचे व्रत सांगितले. ती म्हणाली, बाई शुक्रवारचे व्रत कर. हे शुक्रवार तू श्रावणापासून धर. सारा दिवस उपास करावा. संध्याकाळी सवाष्णीस बोलवावे, तिचे पाय धुवावे, तिला हळद-कुंकू द्यावे, तिची ओटी भरावी, साखर घालून

दूध प्यायला द्यावे. भाजलेल्या हरभऱ्यांची खिरापत द्यावी. नंतर आपण जेवावे. याप्रमाणे वर्षभर करून नंतर त्याचे उद्यापन करावे, असे सांगितले. ती घरी आली, देवाची प्रार्थना केली व शुक्रवारचे व्रत करू लागली.

त्याच गावात तिचा भाऊ राहत असे. तो एके दिवशी सहस्र-भोजन घालू लागला. साऱ्या गावाला आमंत्रण केले. बहिणीला काही बोलाविले नाही. ती गरीब, तिला बोलाविले तर लोक हसतील. पुढे दुसरे दिवशी मारे भावाकडे ब्राह्मणांचे थवेच्या थवे येत आहेत, पोटभर जेवत आहेत. बहिणीने विचार केला, आपला भाऊ सहस्रभोजन घालतो आहे, बोलावणे करायला विसरला असेल, तर आपल्या भावाच्या घरी जायला काही हरकत नाही. तिने जायचे ठरवले. सोवळे नेसली. बरोबर मुलांना घेतले आणि भावाच्या घरी गेली. पुष्कळ पानं मांडली होती. एका पानावर जाऊन बसली. शेजारच्या पानांवर मुलांना बसविले. सर्व पाने भरली, सारे वाढण झाले तेव्हा तिच्या भावाने तूप वाढायला घेतले. वाढता वाढता तिच्या पानाशी आला, ती खाली मान घालून बसली होती. भावाने तिला हाक मारली. ताई, ताई, तुला वस्त्र नाही, पात्र नाही, दाग नाही, दागिना नाही. तुझ्याकडे पाहून सगळे लोक मला हसतात. ह्यामुळे मी काही तुला बोलाविले नाही. आज तू जेवायला आलीस ते आलीस, आता उद्या काही येऊ नकोस. असे सांगून पुढे गेला. ही आपली तशीच जेवली. हिरमुसले तोंड केले, मुलांना घेऊन घरी आली.

दुसरे दिवशी मुले म्हणू लागली, आई, आई, मामाकडे जेवायला चल. बहिणीने विचार केला, कसा झाला तरी आपला भाऊच आहे. बोलला म्हणून काय झाले? आपली गरिबी आहे

तर आपल्याला ऐकून घेतलेच पाहिजे. आजचा दिवस आपला बाहेर पडला, तितकाच फायदा झाला. असे म्हणून त्याही दिवशी भावाकडे जेवायला गेली.भाऊ तूप वाढता वाढता तिच्या पानाशी आला. ही मान खाली घालून बसली होती. भावाने तिला हाक मारली, ताई, ताई, भिकारडी ती भिकारडी आणि सांगितलेले ऐकत नाही. तू जेवायला येऊ नको म्हणून काल सांगितलं, आज आपली डुकरिणीसारखी पोरे घेऊन आलीस. तुला लाज कशी वाटली नाही ? आलीस तर आलीस, उद्या आलीस तर हात धरून घालवून देईन. तिने मुकाट्याने ऐकून घेतले, जेवून उठून चालती झाली. पुन्हा तिसरे दिवशी जेवायला गेली. भावाने पाहिले. हात धरून घालवून दिली. फार दुःखी झाली. प्रार्थना केली. सारा दिवस उपास पडला. देवीला तिची दया आली. दिवसानुदिवस सुखाचे दिवस दाखवू लागली.

असे करता करता वर्ष झाले. बाईचे दळिद्र गेले. पुढे एके दिवशी ती शुक्रवारचे उद्यापन करू लागली. भावाला जेवायला बोलाविले. भाऊ मनात ओशाळा झाला. बहिणीला म्हणू लागला, ताई, ताई, तू उद्या माझ्या घरी जेवायला ये, नाही काही म्हणू नकोस. घरी काही जेवू नकोस. उद्या तू आली नाहीस तर मी काही तुझ्या घरी येणार नाही. बहिणीने बरे म्हटले, भावाच्या मनातले कारण जाणले. दुसऱ्या दिवशी लवकर उठली, वेणीफणी केली, दागदागिने ल्याली, उंची पैठणी नेसली, अशी भावाकडे जेवायला गेली. तो भाऊ वाट पाहातच होता. ताई आली तशी तिचा हात धरला, पाटावर बसवली, पाय धुवायला ऊन पाणी दिले. पाय पुसायला फडके दिले. इतक्यात जेवायची पाने वाढली, ताईचे पान आपल्या शेजारी मांडले. भाऊ जेवायला बसला. ताईने

आपली शालजोडी काढून बसल्या पाटी ठेवली. भाऊ पाहू लागला. मनात कल्पना केली, शालजोडीने उकडत असेल म्हणून काढीत असेल. नंतर ताई आपले दागिने काढू लागली. बसल्यापाटी ठेवू लागली. भावाने विचार केला, जड झाले म्हणून काढीतें असेल. नंतर ताईने भात कालवला. मोठा घास केला, तो उचलून सरीवर ठेविला. भाजी उचलून ठुशीवर ठेविली. लाडू उचलून चिंचपेटी-वर ठेवला. जिलबी उचलून मोत्याच्या पेंड्यावर ठेविली. भावानं विचारले, ताई, ताई, हे काय करतेस ? ती म्हणाली, दादा, मी करते हेच बरोबर आहे. जिला तू जेवायला बोलाविलंस तिला मी भरविते आहे. भाऊ काही हे समजेना. त्याने तिला पुन्हा सांगि-तलं, अग ताई, तू आता जेव तरी. तिने सांगितले, बावा, हे माझे जेवण नाही. हे ह्या लक्ष्मीचे जेवण आहे. माझं जेवण होतं ते मी सहस्रभोजनाच्या दिवशी जेवले. इतके ऐकल्यावर भाऊ मनात ओशाळला. तसाच उठला. आणि बहिणीचे पाय धरले. झाल्या अपराधाची क्षमा मागितली. बहिणीने केली. नंतर दोघेजण जेवले. मनातली अढी काढून टाकली. दोघांनी देवीचे आभार मानले. भाऊ बहिणीकडे जेवायला गेला. तिला आनंद झाला. देवीने जसे तिला समर्थ करून आनंदी केले. तसे तुम्हां आम्हां करो. ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

## ५) गणेशोत्सव, दसरा, दीपावली, संक्रांत, होळी

**'भाद्रव्यात येती गौरीगणपती'**

श्रावणाप्रमाणेच भाद्रपदही उत्सवांनी व सणांनी समृद्ध असा

महिना आहे. याच महिन्याच्या शुद्ध चतुर्थीस घरोघरी गणपतीचे आगमन होते. गणपतीची सुबकशी मूर्ती आणून तिची प्राणप्रतिष्ठा करतात. तिच्याभोवती आरास करतात. रात्री 'सुखकर्ता दुखहरता' इत्यादी आरत्यांचा नाद घुमतो. गणपतीला मोदकांचा नैवेद्य होतो. सिंदूर, शमी, कमल, दूर्वा इत्यादींनी गणपतीचे यथाविधी पूजन होते. गणपतीची प्रतिष्ठापना सार्वजनिक रीतीनेही आजकाल सर्वत्र होते. वर्गणी गोळा केली जाते. मोठमोठ्या मूर्ती तयार होतात. दिव्यांची, देखाव्यांची शोभा वाढत असते. लोकांत एकजूट व्हावी, सामाजिक प्रबोधन व्हावे म्हणून लोकमान्य टिळकांनी ही सार्वजनिक गणेशोत्सवाची पद्धत सुरू केली. पूर्वी गणपतीच्या उत्सवात कथा, कीर्तने, व्याख्याने, मेळे, गायन इत्यादी कार्यक्रम होत असत. आता प्रामुख्याने भर विजेच्या रोषणाईवर, देखाव्यावर असतो. नृत्यादी कार्यक्रम, सिनेमा, नाटके, कथाकथन यांच्या मार्गाने गणपतीचा उत्सव आता अधिक मनोरंजनात्मक होत आहे.

गणपती हा शिवपार्वतींचा पुत्र असून याच्या जन्माच्या व पराक्रमाच्या अनेक कथा पुराणांतून मिळतात. याचे शरीर माणसाचे व मस्तक हत्तीचे असते. गणपतीची विविध ध्याने व त्याच्या नाना मूर्ती भक्तांना आवडतात. वक्रतुंड, गजानन, एकदंत, भालचंद्र, विनायक, चिंतामणी, लंबोदर; अशी अनेक नावे गणपतीस शोभून दिसतात. गणेशाच्या नाना अवतारांच्या कथाही प्रसिद्ध आहेत. थेऊर, मोरगाव, रांजणगाव, पाली, मढ, सिद्धटेक, पुळे, हेदवी; इत्यादी ठिकाणचे गणपती प्रसिद्ध असून यांतील काही अष्टविनायकांतील म्हणून विख्यात आहेत. गणपती हे एक आद्य दैवत मानले असून प्रत्येक मंगल प्रसंगी याची पूजा केली की सर्व विघ्ने

दूर होतात, असा विश्वास आहे. आपल्या शिक्षणाचा आरंभही श्रीगणेशाय नमःपासून होतो. या मंगलमूर्तीच्या पूजनाचा मंत्र असा आहे,

**विद्यारम्भे विवाहे च प्रवेशे निर्गमे तथा ।**
**संग्रामे संकटे चैव विघ्नस्तस्य न जायते ।।**

विद्येस आरंभ करताना, विवाहासारख्या संस्कारांच्या वेळी' प्रवेश करताना, यात्रेस आरंभ करताना, संग्रामसमयी, संकटकाळी जो या गणपतीचे पूजन वा स्मरण करील त्याला विघ्न कधीच येत नाही. गणपती हे पेशव्यांचे दैवत असल्यामुळे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गणपतीची मंदिरे दिसतात. गणपती हा सुखकारक, दुःख निवारण करणारा, विघ्न दूर करणारा आहे. याची कृपा झाली की संतोष निर्माण करणारा आहे. कोकणात याचा जन्मोत्सव अनेक ठिकाणी माघ शु. चतुर्थीपासून साजरा करतात. इतरत्र भाद्रपदात अनंत चतुर्दशीपर्यंत मोठ्या थाटाने व उत्साहाने हा उत्सव साजरा करतात. मोठ्या शहरांतील उत्साह तर पाहाण्यासारखा असतो. बॅन्ड, ढोल, लेजमी, ताशे, वाजंत्री, शोभेचे दारुकाम इत्यादींनी युक्त अशी विसर्जनाची मिरवणूक रात्रभर चालू असते.

याच गणपतीच्या उत्सवात घरोघरी गौरींचे आगमन होते. भाद्रपदात ज्या गौरी येतात त्यांना ज्येष्ठा गौरी म्हणतात. अनुराधा नक्षत्रावर गौरी घरी येतात. ज्येष्ठा नक्षत्रावर त्यांचे पूजन होते. मूळ नक्षत्रावर त्यांचे विसर्जन होते. गौरीची प्रतिमा कोणी धातूची, कोणी मातीची, कोणी कागदावरील चित्राची करतात. तर काही ठिकाणी पाच लहान खडे मांडूनही गौरीची प्रति-

ष्ठापना होते. गौरीपुढे रांगोळी घालून आरासही केली जाते. राजस्थानात या गौरींच्या निमित्ताने गौरीनृत्यही होते.

## नवरात्र व दसरा

आश्विनातील पहिल्याच दिवशी घरोघरी देवीचे नवरात्र बसते. आश्विन हा शरदऋतूमधील पहिला महिना असून याच्या पौर्णिमेच्या आगेमागे अश्विनी नक्षत्र असल्यामुळे याला आश्विन असे नाव मिळाले आहे. पहिल्याच दिवशी नवरात्र सुरू होऊन घटस्थापना होते. पाचव्या दिवशी ललितादेवीची पूजा असते. नवमीस दुर्गेसाठी हवन व दशमीस दसरा वा विजयादशमी नावाचा मोठा सण येतो. पौर्णिमेस कोजागिरी असते. या रात्री लक्ष्मी व ऐरावतावरील इंद्र यांची पूजा करायची असते. रात्री चांदण्यात लोक एकत्र जमून जागतात, दूध चंद्राला दाखवून पितात. रात्री लक्ष्मी व इंद्र यांची पूजा करून खालील मंत्र म्हटला जातो–

**नमस्ते सर्वदेवांना वरदाऽसि हरेः प्रिया ।**
**या गतिस्त्वत्प्रपन्नानां सा मे दर्शनात् त्यात्तव ।।**

‘हरिप्रिये लक्ष्मी, तू सर्व देवांना वर देणारी आहेस. तुला नमस्कार असो. तुला शरण येणाऱ्यांना जी गती लाभते, ती तुझ्या पूजेने मला प्राप्त होवो.’ या दिवशी मध्यरात्री लक्ष्मी चंद्रमंडलातून भूमीवर उतरते व ‘को जागर्ति–कोण जागा आहे ?’ असे विचारते व जागा असेल त्याला ती धनधान्य देते.

आश्विनातील नवरात्रव्रत महाराष्ट्रात घरोघरी असते. घरात देवीची स्थापना करतात. तेथे एका घटाची स्थापना करून त्याची पूजा करतात. घटाभोवती थोडी माती टाकून, तीवर पाणी




शिपून तीत गहू पेरतात. नऊ दिवस सप्तशतीचा पाठ करतात. अखंड दीप असतो. घटास रोज नवी माळ बांधतात. नऊ दिवस कुमारीचे पूजन करून तिला भोजन देतात. नवरात्रीचा उत्सव अलीकडे सार्वजनिक रीतीनेही साजरा होत असतो. दुर्गापूजा नावाने गुजराथमध्ये, बंगालमध्ये फार मोठ्या प्रमाणावर हा उत्सव होतो. मोठी आरास करतात. शारदीय व्याख्याने, प्रवचने होतात. महाराष्ट्रात माहूर, तुळजापूर, कोल्हापूर, वणी, चतुःशृंगी इत्यादी ठिकाणी देवीचे मोठे उत्सव होतात. आरत्या, अष्टके म्हटली जातात. देवीच्या आख्यानावर कीर्तने होतात. 'आश्विन शुद्ध पक्षीं अंबा बैसली सिंहासनीं हो' अशी नवरात्रीची आरती म्हटली जाते. 'अनादि निर्गुण प्रगटली भवानी' असा एकनाथांचा जोगवा म्हटला जातो.

नवव्या किंवा दहाव्या दिवशी नवरात्र उठते. घटाभोवती गव्हाचे जे लहान लहान कोंभ आलेले असतात त्यांना सुरवर म्हणतात. त्यांनी व फुलांनी हत्यारांची, लेखनसाहित्याची, पुस्तकांची पूजा केली जाते. फुलांच्या माळा लावून घर शृंगारतात. या दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघनाचा कार्यक्रम असतो. एकमेकांना सोने म्हणून आपट्याची पाने देण्याची प्रथा आहे. या तिथीस विजयादशमी असेही नाव आहे. क्षत्रियांत या दसऱ्यास विशेष महत्त्व होते. पावसाळा संपून नद्यांचे पूर कमी झालेले असतात. परमुलखावर स्वारी करण्याचे बेत रचिले जात. हत्ती शृंगारून मिरवणूक सीमेपार जाई. मराठेशाहीत या दसरा सणास विशेष महत्त्व होते. म्हैसूरदरबाराचा दसरा सर्व भारतात प्रेक्षणीय असे. विजयाचा, पराक्रमाचा हा सण प्राचीन काळापासून मान्य झाला आहे. अर्जुनाने अज्ञातकाळी आपली शस्त्रास्त्रे शमीवृक्षाच्या ढोलीत ठेविली होती. ती हातात घेऊन तो विराट राजाच्या गाई परत आणण्यास गेला तो याच दिवशी. रामचंद्रांनी रावणाचा वध करून विजय मिळविला तो याच दिवशी. नाता प्रकारांनी दसऱ्याचा सण सर्वत्र साजरा होतो. कातकरी व ठाकूर यांच्या स्त्रिया या दिवशी नृत्य करून गाणे म्हणतात. टिपऱ्यांचा ताल धरून त्या म्हणतात;

**राजा बोले परधानाला। बोलवा फासेपारध्याला ।।**
**फासा त्यांनी टाकल वनांत । हरण पळत सुटीला ।**
**जाऊन पडला फासांत । बोलवा मलारी बालाला ।**
**हरणाची किंमत काय बोला । हरणाचे साठ रुपये।।**

### आणि अशी दीपावली

सर्व भारतात अत्यंत उत्साहाने आणि आनंदाने साजरा होणारा

सण म्हणजे दिवाळी वा दीपावली. दीपावली म्हणजे दीपांची रांग. आश्विन महिन्याच्या अखेरीस व कार्तिकाच्या प्रारंभी हा सण येतो. अमावस्येच्या काळोखात असंख्य दिवे लावून सृष्टी प्रकाशित केली जाते. उंच आकाशकंदील डुलत असतात. मुले स्नान करून, गोड पदार्थ खाऊन, नवे कपडे घालून आनंदात असतात. फटाकडे उडवितात. त्यांना या दिवसांत सुटी असते. चार दिवस घरात गोड पदार्थ करतात. अत्यंत उत्साहाने दिवाळीचे चार दिवस लोक गाजवितात. जुनी दुखणी विसरून नव्या सुखाचे स्वागत करायचे असते. एकमेकांना भेटी द्यायच्या असतात. शुभचिंतन करायचे असते.

ही दीपावली तीन अथवा चार दिवसांची असते. खरे म्हणजे आश्विन वद्य १२ पासूनच म्हणजे वसुबारसेपासूनच दिवाळीची चाहूल लागते. या दिवशी बायका गायवासरांची पूजा करतात. या वसुबारसेची कहाणी अशी आहे.

## कहाणी वसुबारसेची

आटपाट नगर होते. तिथे एक कुणब्याची म्हातारी होती. तिला एक सून होती. गाईगुरे होती. ढोरं-म्हशी होत्या, गव्हाळी, मुगाळी वासरे होती. एके दिवशी काय झाले, आश्विनमास आला, पहिल्या द्वादशीच्या दिवशी म्हातारी सकाळी उठली, शेतावर जाऊ लागली. सुनेला हाक मारली. मुली मुली, इकडे ये. सून आली. काय म्हणून म्हणाली. तशी म्हातारी म्हणाली, मी शेतावर जाते. दुपारी येईन. तू माडीवर जा, गव्हाचे, मुगाचे दाणे काढ, गव्हाळे मुगाळे शिजवून ठेव. असे सांगितले. आपण निघून शेतावर गेली. सून माडीवर गेली, गहू, मुग काढून ठेविले, खाली आली, गोठ्यात

गेली. गऱ्हाळी मुगाळी वासरे उड्या मारीत होती. त्यांना ठार मारले, चिरले व शिजवून ठेवून सासूची वाट पाहात बसली. दुपार झाली, तशी सासू घरी आली. सुनेने पाने वाढली, सासूने देखिले, तांबडं मांस दृष्टीस पडले. तिने हे काय म्हणून सुनेला पुशिले, सुनेने सर्व हकीकत सांगितली. सासू घाबरली. न समजता चुकी घडली, म्हणून तशीच उठली, देवापाशी जाऊन बसली. प्रार्थना केली. देवा, हा सुनेच्या हातून अपराध घडला, तिला ह्याची क्षमा कर. गाईची वासरे जिवंत कर. असे न होईल तर संध्याकाळी मी आपला प्राण देईन.' असा निश्चय केला, देवापाशी बसून राहिली. देवाने तिचा एकनिश्चय पाहिला. निष्कपट अंतःकरण देखिले. पुढे संध्याकाळी गाई आल्या, हंबरडे फोडू लागल्या, तशी देवास चिंता पडली. हिचा निश्चय ढळणार नाही असे देवास वाटले. मग देवाने काय केले ? गाईची वासरे जिवंत केली. ती उड्या मारीत मारीत प्यायला गेली. गाईंचे हंबरडे बंद झाले. म्हातारीला आनंद झाला, सुनेला आश्चर्य वाटले. तसा सर्वांना आनंद झाला. नंतर म्हातारीने गाईगोऱ्यांची पूजा केली. स्वयंपाक करून नैवेद्य दाखविला. देवाचे आभार मानले, नंतर आपण जेवली. आनंदी झाली. तसे तुम्ही आम्ही होऊ. ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी, देवा ब्राह्मणांचे द्वारी, पिंपळाच्या पारी, गाईच्या गोठी सुफळ संपूर्ण.

## दिवाळीचे चार दिवस

धनत्रयोदशीस यमराजास प्रसन्न करण्यासाठी दीपदान करायचे असते. घरातील सोनेनाणे, दागदागिने स्वच्छ करतात. विष्णू, लक्ष्मी, कुबेर, योगिनी, गणेश, नाग, द्रव्यनिधी यांचे पूजन केले

जाते. अखंड दीप लावतात. पायसाचा नैवेद्य दाखवितात.

या दिवसाची एक लहानशी कथा आहे. यमराजाने एकदा आपल्या दूतांना विचारले,

'दूतांनो, तुम्ही प्राण्यांचे प्राण हरण करता तेव्हा तुम्हांस दुःख होत नाही ? या प्राण्यांची दया येत नाही ?'

'यमदेवा, एकदा असा प्रसंग आला होता. हेमराज नावाच्या राजाला एक पुत्र झाला. षष्ठीपूजनाच्या दिवशी सटवीनं त्याचं भविष्य सांगितलं की, 'हा मुलगा लग्नानंतर चौथ्या दिवशी मृत्यू पावेल.' हे ऐकून राजानं त्या मुलास गुहेत लपवून ठेविलं. सोळाव्या वर्षी त्याचं लग्न झाल्यावर आम्ही तिथं त्याचे प्राण हरण करण्यासाठी गेलो. त्यावेळी तिथला शोक ऐकून आमचं अंतः-करण द्रवलं. पण आपली आज्ञा कशी मोडावी ? आम्ही त्याचा जीव काढून घेतला. महाराज, जीवाचा अपमृत्यू टाळण्यासाठी एखादा उपाय सांगावा.'

'दूतांनो, धनत्रयोदशीच्या दिवशी जो दीपदान करील, त्याला अपमृत्यू येणार नाही.'

अशा या कथेतून धनत्रयोदशीचे व्रत प्रचारात आले. आयुर्वेदाचा प्रणेता धन्वंतरी याचाही जन्म याच दिवशी झाला असे सांगतात. आश्विन वद्य चतुर्दशी नरकचतुर्दशी म्हणून प्रसिद्ध असून खरी दिवाळी याच दिवसापासून सुरू होते. या दिवशी पहाटे उठावे लागते. सर्वत्र दिवे लावतात. अंगाला सुवासिक तेल लावतात व उष्ण पाण्याने मंगल स्नान करतात. यमराजाला वंदन करून जलांजली देतात. दीपदान, शिवपूजा, नक्तभोजन; असाही काही उपचार असतो. या नरकचतुर्दशीचीही एक पौराणिक कथा आहे.

प्राग्ज्योतिषपूरचा एक राजा नरकासुर नावाचा होता. त्याला

भूदेवीकडून वैष्णवास्त्राची प्राप्ती झाल्यामुळे तो फार बलाढ्य झाला होता. तो देवादिकांनाही त्रास देत असे. इंद्राचा ऐरावत त्याने हरण केला होता. त्याने अनेक राज्यांतील सोळा सहस्र कुमारिका पळवून आणून आपल्या बंदिखान्यात ठेविल्या होत्या. त्याच्या या अत्याचारांनी सर्व लोक त्रासले होते. त्यांनी भगवान श्रीकृष्णांची प्रार्थना केली. तेव्हा कृष्णांनी नरकासुरावर स्वारी करून त्याला ठार केले. सोळा हजार कन्यांची मुक्तता केली. त्यांना अत्यंत आनंद झाला. या कुमारींशी लग्न कोण करणार ? त्यांनी श्रीकृष्णा-सच आपला धनी, पती मानले. श्रीकृष्णांनी त्यांचा स्वीकार केला. ही गोष्ट घडली आश्विन वद्य चतुर्दशीस. प्राण सोडताना नरका-सुर श्रीकृष्णांना म्हणाला,

'आजच्या दिवशी पहाटे जो मंगल स्नान करील, त्याला कधी नरकात जावं लागू नये.'

श्रीकृष्णांनी त्याला तसा वर दिला. म्हणून आश्विन वद्य चतु-र्दशी ही नरकचतुर्दशी मानली गेली. या दिवशी पहाटे उठून मंगल स्नान करायचे असते. पहाटे दीपोत्सवही करतात.

नंतरचा दिवस अमावस्येचा असतो. याही दिवशी पहाटे मंगल स्नान करावे. लक्ष्मी, विष्णू, कुबेर यांची पूजा करावी. इष्ट-मित्रांना बोलवावे. लक्ष्मीपूजन करण्यासाठी चौरंगावर अष्टदल कमल अथवा स्वस्तिक काढतात. त्यावर लक्ष्मीची मूर्ती स्थापन करून तिची व कुबेराची पूजा करतात. या देवदेवतांना नैवेद्य दाखवितात. साळीच्या लाह्या, बत्तासे यांचा प्रसाद सर्वांना वाट-तात. पुराणांतून असे वर्णन आहे की, आश्विनी अमावस्येस लक्ष्मी सर्वत्र भ्रमण करून स्वतःच्या निवासासाठी स्थान शोधीत असते. जेथे स्वच्छता, शांतता, शोभा, उत्साह असतो तेथे ती स्थिरावते.

याच दिवशी विष्णूंनी लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले. म्हणून या दिवशी प्रत्येकजण घरी लक्ष्मीचे पूजन करतो.

यानंतर कार्तिकमास सुरू होतो. पहिलाच दिवस बलिप्रतिपदा म्हणून ओळखला जातो. या रात्री बळीची पूजा करतात. बली व त्याची पत्नी विंध्यावली यांची चित्रे काढून त्यांची पूजा करून प्रार्थना करावी.

**बलिराज नमस्तुभ्यं विरोचनसुत प्रभो ।**
**भविष्येन्द्रासुराराते पूजेयं प्रतिगृह्यताम् ।।**

'विरोचनपुत्र, सामर्थ्यशाली बलिराजा, तुला नमस्कार असो. तू भविष्यकालीन इंद्र व असुरशत्रू आहेस, तरी मी केलेली ही पूजा तू ग्रहण कर.'

याच दिवशी विक्रम संवताचा प्रारंभ होतो. या दिवशी पहाटे पतीने अंघोळ केल्यावर त्याची पत्नी त्याला ओवाळते. दीपावलीचा हा दिवस मुख्य मानतात. पार्वतीने याच दिवशी शंकरांना द्यूतात हरविले. म्हणून या दिवसास द्यूतप्रतिपदा असेही म्हणतात. याच दिवशी गोवर्धनपूजाही करण्याची प्रथा आहे. शेणाचा पर्वत करून त्यावर दूर्वा, फुले खोवतात. कृष्ण, गोपाळ, इंद्र, गायी, वासरे यांची चित्रे या पर्वतावर ठेवतात. गोठ्यातील गुरांना, गायी-बैलांना सजवून त्यांची पूजा करतात.

या दीपावलीशी अनेक कथा निगडित आहेत. चौदा वर्षांचा वनवास संपवून श्रीराम याच दिवशी अयोध्येस आले. म्हणून नगरवासी लोकांनी दीपोत्सव केला. याची ही स्मृती मानतात. दीपावलीची आणखी एक कथा पुराणात आहे. प्राचीन काळात

बळी नावाचा एक बलाढ्य राजा होऊन गेला. त्याने सर्व पृथ्वी जिंकून सर्व देवदेवतांना व लक्ष्मीला तुरुंगात टाकले. मग विष्णूंनी वामनावतार धारण करून बळीस तीन पावलांच्या भूमीचे दान मागितले. दान मिळताच वामन विश्वव्यापी झाला. एका पावलाने त्याने पृथ्वी व दुसऱ्या पावलाने स्वर्ग व्यापला. तिसरे पाऊल बळीच्या मस्तकावर ठेवून त्यांनी त्याला पाताळलोकात पाठवून दिले. बळीने वामनास एक वर मागितला, ' देवा, जो कुणी या तीन दिवसांत यमासाठी दीपदान करील, त्याला यमयातना भोगाव्या लागू नयेत.' बळीची ही विनंती वामनाने मान्य केली. म्हणून दिवाळीत दीपदान व दीपोत्सव यांना महत्त्वाचे स्थान मिळाले.

प्रतिपदेनंतर यमद्वितीया म्हणजे भाऊबीजेचा दिवस येतो. दिवाळीचा हा शेवटचा दिवस. या दिवशी बहीण भावाला ओवाळते. भाऊ बहिणीला देणगी म्हणून काही भाऊबीज घालतो. भावाबहिणीच्या स्नेहाचे प्रतीक म्हणजे हा दिवस होय.

हा दिवस यमद्वितीया म्हणूनही ओळखला जातो. कथा अशी आहे की, मृत्युदेव यमाने या दिवशी स्वतःची बहीण यमी वा यमुना हिच्या घरी जाऊन तिला वस्त्रालंकारांनी समृद्ध केले. तेव्हापासून हा दिवस भाऊबीजेचा म्हणून ओळखला गेला. यम व यमी यांचा काव्यमय संदर्भ असा आहे. यम मृत्यू पावला तेव्हा यमीच्या डोळ्यांतील अश्रू काही थांबेनात. कोणत्याही देवाकडून तिचे सांत्वन होईना. अखेरीस देवांनी रात्र निर्माण केली. रात्र झाल्यावर यमी भावाचे दुःख थोडेसे विसरली. रात्रीनंतर आज व काल असा काळाचा भेद सुरू झाला. भाऊ व बहीण यांच्यांतील प्रेमाचे प्रतीक म्हणून या दिवसास महत्त्व आहे.

कार्तिक शु. १४ हा दिवस हरिहरांच्या मीलनासाठी प्रसिद्ध असून त्यास वैकुंठचतुर्दशी म्हणून ओळखले जाते. शुद्ध १५ हा दिवस त्रिपुरी पौर्णिमा म्हणून सर्वत्र साजरा होतो. या दिवशी शंकरांनी त्रिपुरासुराचा नाश केला. या दिवशी शिवालयांतून दीपोत्सव होतो. काही ठिकाणी या दिवशी कृत्तिकामहोत्सव साजरा करतात. याच कार्तिक व. १३ स प्रसिद्ध तत्त्वज्ञ कवी व संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी आळंदीस अजानवृक्षाखाली समाधी घेतली. या दिवसापासून संतमंडळ पोरके झाले. पुढील मार्गशीर्ष महिन्यात शुद्ध एकादशीस श्रीकृष्णांनी अर्जुनास रणांगणावर गीता सांगितली. हा दिवस गीताजयंती या नावाने प्रसिद्ध आहे. कोणताही हेतू वा इच्छा मनात न धरता कर्म करण्याचा उपदेश भगवंतांनी अर्जुनास दिला. मार्गशीर्षाच्या शुद्ध चतुर्दशीस वा पौर्णिमेस दत्तजयंतीचा मोठा उत्सव सर्वत्र होतो. या दिवशी अत्री व अनसूया यांना दत्तात्रेयांचा लाभ पुत्ररूपाने झाला. माहूर, गाणगापूर, औदुंबर, नरसोबाची वाडी इत्यादी दत्तक्षेत्रांत या उत्सवास प्राधान्य आहे. पुढल्या पौषमासात श्रीनृसिंहसरस्वतींचा जन्म पौष शु. २ रोजी पाळला जातो. या निमित्तानेही जयंतीचा समारंभ होतो.

## मकरसंक्रात, होळीपौर्णिमा

याच पौष महिन्यात सर्व मनुष्यांत गोड संबंध निर्माण करणारा मकरसंक्रांतीचा सण सर्वत्र मोठ्या उत्साहाने पाळला जातो. या दिवशी सूर्य मकरराशीत प्रवेश करतो. मकरसंक्रांत बहुधा १४ जानेवारीस येते. टिळकपंचांगाप्रमाणे ती १० जानेवारीस येते. या पुण्यकाळी गंगादी नद्यांत स्नान करण्याचे पुण्य सर्वत्र मानले गेले

आहे. नाना प्रकारची दानेही सांगितली आहेत. हेमाद्री नावाच्या ग्रंथकाराने म्हटले आहे;

**धेनु तिलमयीं राजन् दद्याद्यश्चोत्तरायणे ।**
**सर्वान्कामानवाप्नोति विन्दते परमं सुखम् ।।**

जो मनुष्य मकरसंक्रांतीच्या दिवशी तिलमय धेनूचे दान करतो, त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होऊन तो सुखी होतो. या दिवशी घरातील देवांना तिळाचा व गुळाचा नैवेद्य दाखवितात. हलव्याचे दागिने नववधूला करतात. तिळाच्या वड्या एकमेकांना देऊन वा हलवा हातावर ठेवून ' तिळगूळ घ्या गोड बोला ' असे या दिवशी म्हणायची रीत आहे. मागील वैर विसरून पुढे चांगले संबंध ठेवावेत, हा यातील मथितार्थ होय. या संक्रांतीचे माहात्म्य पुराणांतून वर्णन केले आहे. पवित्र तीर्थस्थानी स्नानासाठी, दानासाठी असंख्य लोक जमताना दिसतात. यानंतर माघात रथसप्तमी येते. या दिवशी भक्तिभावाने सूर्याची पूजा केली जाते. याच महिन्यातील वद्य १४ स शिवालयांत महाशिवरात्रीचा उत्सव साजरा केला जातो.

फाल्गुनात होळीपौर्णिमेचा एक विशिष्ट प्रकारचा सण साजरा होतो. या सणास शिमगा, होलिकोत्सव, कामदहन अशी नावे आहेत. अशी समजूत आहे की, गोकुळात श्रीकृष्ण लहान असताना पूताना त्याला आपल्या स्तनांतून विष पाजण्यासाठी आली होती. तिचा वध श्रीकृष्णांनी याच दिवशी केला. पूर्वी ढुंढा नावाची राक्षसीण लहान मुलांना फार त्रास देत असे. तिला शिव्या देऊन, अग्नी निर्माण करून भिवविण्याची प्रथा या होळीच्या रूपाने सुरू झाली, अशीही एक समजूत आहे. या दिवशी शिवांनी मदनास




जाळले, अशीही एक समजूत आहे. फाल्गुन व. २ स संत तुकोबा-रायांचे वैकुंठास प्रयाण झाले. शके १५७१ मध्ये. त्या दिवशी तुकारामबीजेचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर होतो. शके १५५१ च्या फाल्गुन वद्य ३ रोजी राजे शिवाजी यांचा जन्म शिवनेरीच्या किल्ल्यावर झाला. शिवजयंतीचा उत्सव महाराष्ट्रात सर्वत्र मोठ्या उत्सहाने व मोठ्या थाटाने साजरा होतो. वद्य ६ रोजी पैठणच्या एकनाथांची पुण्यतिथी साजरी होते.

# ६) मेळावे, यात्रा, जत्रा

## धार्मिक मेळावे, पर्वकाळचे उत्सव

भारतीय जनमानसावर धार्मिक श्रद्धेचा प्रभाव अद्यापही खूप मोठा आहे. गुरू सिंह राशीत गेला की सिंहस्थ सुरू होतो. या पर्वकाळी गोदावरीचे स्नान गंगास्नानाएवढेच पवित्र मानले आहे. दर बारा वर्षांनी गुरू सिंहराशीत येतो. या समयास नासिक येथे फार मोठा मेळावा भरतो. लक्षावधी भाविक लोक गोदावरीत स्नान करतात. दान, जप, तप इत्यादी पुण्यकृत्ये करतात. या पर्वकाळी प्रत्यक्ष गंगानदी गोदावरीस भेटायला येते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. साडेतीन कोटी तीर्थे, तेहतीस कोटी देव यांचाही निवास पर्वकाळात गोदावरी काठी असतो. सिंहस्थ हा गोदावरीचा बारा वर्षांनी येणारा वाढदिवस आहे असे मानले गेले आहे. या मागची एक कथा संक्षेपाने ऐकण्यासारखी आहे.

मांधाता नावाचा एक राजा होता. गौतमऋषी त्याच्या राज्यात तप करीत होते. त्यांना शिवशंकर प्रसन्न झाले. त्यांनी आपल्या जटेचा एक तुकडा गौतमांच्या स्वाधीन केला. तो त्यांनी ब्रह्मगिरीवर स्थापिला व त्यातून गोदावरीचा उगम झाला.

कुंभपर्वाचाच एक भाग म्हणजे सिंहस्थ आहे. श्रावणाच्या अमावस्येस पूर्णकुंभ असतो. त्या वेळी नाशकास फार मोठी यात्रा भरते. सिंहस्थात नासिक येथे अनेक साधू, बैरागी, गोसावी, सत्पुरुष यांचे जणू संमेलनच भरते. नग्न साधूंचीही एक मोठी मिरवणूक निघते. कुंभपर्वही दर बारा वर्षांनी एकदा येते. प्रयाग येथे कुंभमेळा फार मोठ्या प्रमाणात भरतो. प्रयागतीर्थात या पर्वकाळी

स्नान फार पुण्यकारक मानले आहे. मकरसंक्रांत, अमावस्या व वसंतपंचमी या दिवसांना विशेष महत्त्व असते. प्रयागप्रमाणे हरिद्वार, नासिक, उज्जयिनी या ठिकाणीही कुंभमेळा भरतो. या कुंभ-पर्वाचीही एक कथा आहे. देव व दानव यांनी अमृताच्या प्राप्ती-साठी समुद्राचे मंथन केले. त्यावेळी धन्वंतरी हातात अमृताचा कुंभ घेऊन प्रकट झाला. देव व दानव यांच्या मनांत अमृतकुंभा-बद्दल विकल्प आला. म्हणून देवांनी इंद्रपुत्र जयंताला खूण करून धन्वंतरीच्या हातातील कुंभ त्याच्याकरवी पळविला. देवदानवांचे बारा दिवस व बारा रात्र युद्ध झाले. ज्या ठिकाणी या झटापटीत कुंभ पडला त्या ठिकाणी कुंभपर्वणी येते. पण यांतील फक्त चारच स्थाने पृथ्वीवर आहेत. कुंभपर्वाच्या वेळी प्रयागला हत्ती, घोडे, उंट अशा थाटात साधुसंतांचा मेळावा भरतो.

असे धार्मिक मेळावे भारतात अनेक निमित्ताने भरतात. रथ-यात्रा वा रथोत्सव हा एक असाच धार्मिक मेळावा प्रसिद्ध आहे. विशिष्ट दिवशी देवाला रथात बसवून त्याची प्रचंड मिरवणूक काढतात. हजारो, लाखो भक्तगण या रथयात्रेत सामील होतात. जगन्नाथपुरी येथील रथयात्रा सर्वांत मोठी असते. आषाढ शु. द्वितीयेस जगन्नाथाचा रथ निघतो. तो जनकपुरापर्यंत जातो. या रथयात्रेचा प्रारंभ इंद्रद्युम्न नावाच्या राजाने केला असे पुराणांत म्हटले आहे.

## केरळातील ओणम्चा उत्सव

असेच मेळावे भारतात आणखीही आहेत. आता एकदोन पर-प्रांतीय सणांचा वा उत्सवांचा निर्देश थोडक्यात करतो. ओणम् हा एक केरळमधील मोठा सण मानला जातो. चिंगम् म्हणजे

आश्विन महिन्याच्या शुक्लपक्षातील श्रवणनक्षत्रास तिरु ओणम् म्हणतात. आधीच्या दहा दिवस हस्तनक्षत्र असते. येथपासूनच या सणास प्रारंभ होतो. या सणात केरळमध्ये सर्व घरे झाडून स्वच्छ होतात. रंग दिले जातात. घरापुढचा भाग फुलांनी सजविला जातो. फुले गोळा करण्याचे काम मुलांचे असते. दहा दिवस विविध प्रकारची अशी पुष्परचना झाल्यावर श्रवण नक्षत्र असलेली वामनाची शंकूच्या आकाराची मातीची मूर्ती करतात. तिच्या भोवतीही पुष्परचना करतात. तिच्यापुढे सर्वजण 'आरप्पु' असा घोष करतात. या मंगल ध्वनीनंतर वामनाची पूजा होते. सर्व माणसे नटून-थटून उभी राहातात. ती वामनास तृक्काक्करप्पन् असे म्हणतात. घरोघरी भोजनासाठी गोड पदार्थ केलेले असतात. भात, भाज्या, पापड, फळे, खीर, केळ्यांचे तळलेले तुकडे असे पदार्थ भोजनासाठी असतात.

असा हा शारदीय उत्सव केरळात प्राचीन काळापासून चालत आला आहे. तमिळांच्या आळवार गीतांत या उत्सवाचे प्रत्यंतर मिळते. वामन, भगवान श्रीकृष्ण यांचे अवतार ओणम्च्या दिवशी झाले अशीच श्रद्धा आळवारांची आहे. तमिळनाडमधील उत्सवात आजही भगवानांची पूजा करतात. आज हा उत्सव तमिळनाडात घरगुती झाला आहे व केरळमध्ये त्यास सार्वजनिक स्वरूप आले आहे. समुद्रकिनारी या उत्सवाचे स्वरूप विशेष प्रकारचे दिसते. ओणम्चा उत्सव कसा सुरू झाला ? यासंबंधीही एक कथा आहे. बळिराजाने पृथ्वी व स्वर्ग जिंकून साम्राज्य निर्माण केले. त्याच्या राज्यात प्रजेला सुख होते. लोक देवांना विसरून दानवांचा महिमा गाऊ लागले. देवांच्या विनंतीवरून विष्णूंनी वामनावतार धारण केला व बळीस पाताळात ढकलले. वामनाच्या परवानगीने बळी

वर्षातून फक्त एकाच दिवशी पृथ्वीवर येऊन आपल्या प्रजेचे दर्शन घेतो. या प्रजाप्रेमी राजाला आपले दैन्य, दु:ख दिसू नये म्हणून लोक आनंदाने उत्सव करू लागले.

केरळात व महाराष्ट्रातही लोकांना या बळिराजाबद्दल आत्मीयता आहे. दिवाळीच्या पाडव्यास मराठी लोक 'बळीचे राज्य येवो' अशा इच्छा व्यक्त करतात. बळीच्या वेळी सर्व माणसे समान होती, राज्यात चोरी नव्हती, कपट नव्हते, लोक तिळाएवढेही खोटे बोलत नव्हते. असे केरळचा एक लोककवी म्हणतो. या उत्सवावर मल्याळम् भाषेत काव्यरचनाही झालेली आहे. सर्व सामाजिक जीवनात स्नेह, आदरभाव निर्माण करणारा हा सण आहे. या दिवशी माहेरी गेलेली मुलगी सासरी येते. ओणम्च्या दिवसात हौसमौज होते. भेटवस्तू दिल्या जातात. खेळ खेळतात. बायका व मुली नृत्य करतात. वंचिकळी नावाची नौकास्पर्धा होते. केरळात नावाडी खूप असतात. नद्यांत वा खाड्यांत नौका सोडून स्पर्धा सुरू होते. नौकेचे पुढचे टोक बगळ्याच्या मानेसारखे उंच असते. लोक गाणी गातात, वाद्ये वाजवितात. नदीच्या काठावर स्पर्धा पाहाणारांची एकच गर्दी उडालेली असते. रंगीबेरंगी पताका लावलेल्या होड्या नदीतून झराझरा जाऊ लागल्या म्हणजे मोठी मौज दिसते. पंपानदीच्या काठी आरन्मुळा या गावी होणारी नौकास्पर्धा विशेष महत्त्वाची आहे.

या उत्सवामागे एक लहानशी कथा आहे. तीर्थयात्रा करणारा अर्जुन कन्याकुमारीहून परत इंद्रप्रस्थाकडे निघाला. त्याच्याजवळ पार्थसारथीची, कृष्णाची एक मूर्ती होती. तो पंपानदीपाशी आला तेव्हा नदीस महापूर आलेला होता. होड्या बंद होत्या. अशा वेळी एक नावाडी धैर्य करून पुढे आला. त्याने अर्जुनास आपल्या

होडीत बसविले व महापुरातून पलीकडच्या तीरावर नेले. नदी ओलांडल्यावर अर्जुनाने पार्थसारथीची मूर्ती तेथेच स्थापन केली. काही काळानंतर लोकांनी एक मंदिर बांधले. या घटनेच्या स्मृती-साठी आरन्मुळा येथे नौकास्पर्धा सुरू झाल्या.

## तमिळनाडमधील पोंगल उत्सव

दक्षिणभारतातील हा एक महत्त्वाचा उत्सव तीन दिवस चालत असला तरी त्याची तयारी सुमारे महिनाभर चालते. पोंगल हा उत्सव नव्या वर्षाच्या व सूर्याच्या स्वागतासाठी असतो. तमिळ पंचांगाप्रमाणे मार्गशीर्ष हा शेवटचा महिना असतो. अशुभ निवारण व्हावे म्हणून रोगनाशासाठी विधिविधाने केली जातात.शिवांची पूजा अभिषेक करून होते. अंगणात सडा घालून, रांगोळी घालून स्त्रिया एका कोपऱ्यात गोमयाचे गोळे मांडून त्यावर झेंडूची फुले वाहा-तात. हे गोळे विघ्नहरण करतात. शेवटच्या दिवशी संन्यासी लोक पहाटे झांजा वाजवून लोकांना उठवितात. सर्व परिसर मग स्वच्छ केला जातो. विघ्नहर्त्याच्या प्रतीकांची मिरवणूक निघते. गावा-बाहेर त्यांचे विसर्जन होते.

पहिल्या दिवशी भोगी पोंगल असून इंद्राची पूजा होते. दुसऱ्या दिवशी सूर्यास पेरुम पोंगल म्हणतात. या दिवशी सुवासिनी पहा-टेच स्नान करून ओलेत्याने अंगणात दुधाची खीर शिजवतात. खिरीला उकळी फुटली की 'पोंगल ओ पोंगल' अशी मोठ्याने हाक मारतात. सूर्य व गणपती यांना या खिरीचा नैवेद्य दाखवि-तात. काही भाग गाईला देऊन उरलेला सर्वजण प्रसाद म्हणून घेतात. लोक या दिवशी परस्परांना भेटी देऊन 'पोंगल', 'पोंगल' असे म्हणतात. तिसरा दिवस म्हणजे मुट्टू पोंगल होय.

या दिवशी गाईची पूजा होते. सकाळीच केशरमिश्रित जलाने गाईबैलांना स्नान घालतात. त्यांच्या गळ्यांत पुष्पमाला घालतात. शिंगांना बेगड लावून मग त्यांची मिरवणूक काढतात. या दिवशी गुरांना गोड भोजन देतात. नृत्य-गायनांचे कार्यक्रम या दिवशी होतात. तमिळनाडमधील संक्रांतीचे हे असे रूप असते. पोंगल हा एक आनंदपूर्ण उत्सव वा सण सर्वांना वाटतो. या सणात सूर्याची पूजा विशेष मानली आहे. धनधान्य पिकते ते सूर्यामुळे अशी लोकांची श्रद्धा आहे. तिसऱ्या दिवशी लोक गाईबैलांचा सत्कार करून ही श्रद्धा प्रकट करतात.

## महाराष्ट्रातील यात्रा-जत्रा

यानंतर महाराष्ट्रातील यात्रा-जत्रांचे स्वरूप थोड्या विस्ताराने पाहू. आमच्याच गावाकडील जत्रा निरखून पाहू.

'चांगभले बोला चांगभले' अशा गजरात पालख्यांची मिरवणूक सुरू होते. वाजंत्री, ढोल, ताशा, नगारा, लेझीम आणि झांजा यांच्या नादात उत्साहाला उधाण येते. एक पालखी ग्रामदेव भैरवनाथाची, दुसरी शेजारच्या गावाच्या वागजाईची. ही पिंपळीची वागजाई आमच्या खरशीच्या भैरवनाथाची बहीण. आज दुपारीच मुद्दाम भेटायला आलेली असते आणि रात्री दहाच्या सुमारास बहिरोबाच्या मंदिरास प्रदक्षिणा घालून मिरवणुकीला, छबिन्याला प्रारंभ होत आहे. आसपासच्या वाड्यांतले मिळून हजार-पाचशे माणसे छबिन्यात सामील झाली आहेत. त्यांत काही परगावचे आहेत, गावकऱ्यांपैकी काही मुद्दाम मुंबईहून जत्रेसाठी आले आहेत. नवे पोशाख, नवे दागिने, नवी हौस, नवा उत्साह यांनी सारे वातावरण भरून निघते आहे. दोनही पालख्यांमध्ये माझे वडील

आरती धरून उभे आहेत. गुरव चौऱ्या ढाळतो आहे, महार वाजंत्री वाजवीत आहेत, चांभार बुदलीतले तेल मशालीवर ओतीत आहे, आणि समोर लेझम्यांच्या खेळास रंग चढत आहे. 'ढिच्याळ् ढि ढिच्याळ् ढि' करून त्याला दहा-पंधरा ढोलांची साथ रंगत आहे. त्याही पुढल्या बाजूस गावोगावांहून आलेल्या वीस-पंचवीस देवाच्या काठ्या सुशोभित होऊन गगनास भिडताहेत, आणि पालख्यांचे पाऊल पुढे पडले की, पुन्हा 'बोला चांगभले बोला 'चा गजर होऊन सर्वत्र गुलाल उधळला जात आहे.

चैत्री पुनव झाली की, मला आजही गावाकडची ओढ लागते. वद्य अष्टमीच्या रात्रीपासून गावाच्या भैरवनाथाची जत्रा सुरू असते. जत्रेतील दोन दिवसांच्या धामधुमीचे चित्र गेली चाळीस वर्षे माझ्या डोळ्यांपुढे उभे आहे. जागराचा दिवस, ताज्या जत्रेच्या दिवशी रात्रीचा छबिना, शिळ्या जत्रेच्या दिवशी एखाद-दुसरा तमाशा आणि संध्याकाळी कुस्त्यांचा फड; असे जत्रेचे स्थूलमानाने स्वरूप असले तरी त्यात साऱ्या गावचे चैतन्य साकार-लेले असते. लहान-मोठे, स्त्री-पुरुष, पै-पाहुणे सर्वांचाच उत्साह वाढत असतो. भैरवनाथाच्या कृपेने घरचे, व्यवसायधंद्याचे ठीक चालले असल्याची श्रद्धा प्रत्येकाच्या मनात असते. या भैरवनाथाला मांसाचा नैवेद्य लागतो. त्याचा प्रसाद घरोघरी जातो. दुसऱ्या दिवशी पुरणाच्या पोळीचा निवद बहुतेकजण करतात. अनेकांच्या नवसास हा भैरवनाथ पावलेला असतो. धनधान्य, आरोग्य, धद्या-तली बरकत, मुलाबाळांचे सुख यांची प्राप्ती या देवामुळे झाली असल्याचे सर्वांच्या लक्षात असते. मग कोणी भैरवनाथास वस्त्र अर्पण करतो, कोणी त्याच्या उंबरठ्यावर चांदीचे रुपये ठोकतो, कोणी त्याला भरतारी गोंडे अर्पण करतो, कोणी त्याच्या दारात

घंटा बांधतो, कोणी नुसता नारळ फोडून क्षेमयाचना करतो, कोणी दोनदोन-तीनतीन मैलांवरून वाजतगाजत, फुलांच्या माळा गळ्यात घालत, नवे कपडे नेसून साष्टांग दंडवत घालीत भैरवनाथापर्यंत येतात आणि देवाचा नवस फेडतात. पुढील काळासाठी क्षेम-कल्याणाची मागणी करतात.

भैरवनाथावरील या श्रद्धेच्या जोडीला हौसमौज व करमणूक असतेच. या निमित्ताने सर्व लोक एकत्र जमतात, खाजगी वैरभाव विसरण्याचा प्रयत्न करतात. गावाचे एखादे काम पूर्ण करण्याचा विचार होतो. नोकरीधंद्यासाठी ममईस असणारी माणसे या निमित्ताने न चुकता गावाकडे येतात. गावात उत्साहाचे वारे संचारलेले असते. मिठाईची,खेळण्यांची,लुगड्याची,खणांची,अबीर-बुक्क्याची व गुलालाची, दवण्याची व नारळांची, बांगड्यांची व हळदीकुंकवांची दुकाने थाटलेली असतात. टरबुजे व कलिंगडे, ऊस व कुलफी मलई यांची रेलचेल असते. मुलांसाठी चक्रे,पाळणे, घोडे यांचा खेळ असल्यामुळे ती खुषीत असतात. बारा महिने स्वस्थ-शांत असलेले गाव जत्रेच्या निमित्ताने गजबजू लागते. कधी नव्हे ती घाई, गर्दी, धांदल, धावपळ सुरू होते. ताज्या जत्रेच्या दिवशी रात्री छबिना निघाला की आनंदास उधाण येते. प्रत्येकाच्या दारात पालखी थांबते. सर्व जातिजमातींच्या बाया देवाला ओवा-ळतात. मिरवणुकीत कधी लाठी, बोथाटीचे खेळ होतात, कधी दांडपट्टे होतात, कधी कसरतीचे खेळ होतात, कधी झांजल्याची आणि ढोलवाल्यांची जुगलबंदी होते. कधी नाना प्रकारची सोंगे निघून बैलगाड्यांवरून मिरवतात. नटलेल्या, थटलेल्या स्वरूपात राम, सीता, सरस्वती, शंकर, हनुमान, हॅटवाला शिकारी साहेब, माकडे, वाघ इत्यादींच्या सोंगांवर व त्यांच्या खेळांवर सर्वजण

संतुष्ट होऊन जातात.

अशी यात्रा वा जत्रा खरे म्हणजे गावच्या देवाची. धर्माचे काम हे. पण दुसऱ्या दिवशी पहाटेपासूनच जत्रेचे स्वरूप पालटते. रात्रीचे जाग्रण कोणाच्याच डोळ्यांत नसते. सर्वजण देवळाभोवती तमाशासाठी जमतात. वर्गणीतला बराच मोठा भाग खर्चून तमाशा आणलेला असतो. गण-गौळणीत जे काय देवाचे नाव येईल तेवढेच. तेसुद्धा किसनदेवाचे असेल तर त्याच्या ठकबाजीचे आणि गौळणींच्या तक्रारीचेच. मग इष्काच्या लावण्या सुरू होत. पेटीतबल्याचे संगीत तमाशे त्यावेळेस दुर्मीळ होते. डफ व तुणतुणे यांवरच तमाशा रंगत असे. नाचा पोऱ्या मजा उडवून जाई. सोंगाड्या साऱ्यांना हसवून हसवून बेजार करून सोडे. रंगू नाचू लागली की तल्लीन झालेल्यांची पागोटी सुटत, कित्येकजण खुषीत येऊन वर भिरकावून देत, कित्येकजण 'दौलतजादा'ची फेक करीत. शब्दोच्चार, हावभाव, नजरा, नखरे यांतील अर्थ यांची चर्चा करण्यास कोणास सवड नसते. खरे म्हणजे याची जाणही नसते. आदल्या दिवशी भैरवनाथापुढे नाक घासून क्षमाप्रार्थना करणारा हा गडी दुसऱ्या दिवशी रंगेल बनतो व पैसे उधळतो. एकदा नृत्याची धमाल झाली, एकदा आरडाओरडा करून राक्षस येऊन उभा राहिला की, मग सारा मंडप दणाणून जातो. वग सुरू झाला की मग राजा, प्रधानजी, हवालदार, धाकट्या राणीसाहेब, गावची नायकीण यांच्या कथासूत्रात जो तो गुतून गेलेला असतो.

दुपारी चारसाडेचारपर्यंत तमाशाचा हा खेळ चाले. लावण्या, पवाडे, सवालजवाब यांची रंगत एखाद्या चांगल्या वगात-कथानाट्यात मिसळून जाई. हर्ष, दुःख, तिरस्कार, त्वेष, विनोद यांची

लयलूट होई. वगनाट्य संपले की, ‘ चांगभले बोला, चांगभले ’चा गजर होऊन तमाशाचा खेळ संपे. मग देवळाशेजारच्या एखाद्या वावरात कुस्त्यांचा कार्यक्रम होई. एका मोठ्या वर्तुळाभोवती लोक फेर धरून बसत. प्रथम लहान मुलांच्या कुस्त्या होत. जिंकणारा व पडणारा दोघांनाही बत्तासे मिळत. मग थोड्या मोठ्या पोरांच्या कुस्त्या नारळावर होत. त्यानंतर गाजलेले पैलवान आपापल्या उस्तादांच्या पायांना स्पर्श करून आखाड्यात उतरत. दहापंधरा मिनिटे कुस्ती चाले. सर्वांच्या नजरा कुस्तीकडे खेचलेल्या असत. धरणीला पाठ लागली की, कुस्ती संपे. मग पुनः गोंधळ, गडबड, बाचाबाचीही कधी क्वचित होई. पण पंचांचे निर्णय बहुधा मानले जात. विजयी पैलवानास मग खांद्यावर घेतले जाई. त्याला एखादे पागोटे मिळे, कधी रोख रकमेत बक्षीस मिळे. अंधार पडेपर्यंत कुस्त्यांचे असे फड रंगत. मग पुन्हा ‘ चांगभले बोला ’ चा गजर होऊन फड संपत असे.

असे फड, असे तमाशाचे खेळ, असे छबिने; ही माझ्याही लहानपणाची मोठी करमणूक होती. गावोगाव जत्रा-यात्रा पाहाण्या-साठी मी हौसेने जात असे. वहागाव, महू, कावडी, आंबेघर, आखाडे या गावांच्या भैरवनाथाची जत्रा मला आजही चांगली आठवते. पिंपळीची वागजाई, पानसचा कानीफनाथ, हातेघरचा काळेश्वर, करहर व सायघरची जनाई, हुमगावची हुमजाई, वालूथचा मारुती, दापवडीचा कांग्रोबा; अशी अनेक ग्रामदैवते व त्यांच्या जत्रांचे उत्सव मी लहानपणी पाहिलेले असल्यामुळे त्यांचा मनावर ठसा चांगला असे. वडील भागवतधर्मीय म्हणून तमाशाला बेतानेच परवानगी मिळे. त्यांच्या व इतर काही गृहस्थांच्या प्रेरणेने काही गावी तमाशाऐवजी कीर्तने होत. आखाडे-आंबेघर

इत्यादी मोजक्या गावी शेलारमामांची कीर्तने झालेली माझ्या स्मरणात आहेत.

जत्रातून कीर्तने होतात की तमाशे होतात; हा प्रश्न महत्त्वाचा नाही. देवाच्या, धर्माच्या निमित्ताने सर्व लोक एकत्र येतात, दोन-तीन दिवस हौसमौज करतात, गोडधोड करून खातात, नवे कपडे घालून मिरवतात, दागदागिने घालतात व एकदिलाने गावचा उत्सव पार पाडतात. अनेकांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना या प्रसंगी उत्तेजन मिळते. महाराष्ट्रातील अशा अनेक यात्रा व जत्रा यांतून दृष्टीस पडणारे लोकरंजनाचे व धार्मिक वृत्तीचे दर्शन म्हणजे महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे एक अविभाज्य अंग आहे. कोण कोणत्या जातीचे आहे, धर्माचे आहे, व्यवसायाचे आहे याची चौकशी या प्रसंगी नसते. जातिभेदांची सर्व बंधने या प्रसंगी शिथिल झालेली असतात. आसपासची सारी गावे आपापली वैरे क्षणभर बाजूला ठेवून या जत्रेच्या-यात्रेच्या निमित्ताने एकत्र येतात. खांद्याला खांदा भिडून थोडीफार घसट निर्माण होते आणि मग वितुष्टतेची कल्पना विरून जाते. कोणत्या गावाचा कोणता देव, तो लहान की मोठा? असे प्रश्नच नसतात. अशा ग्रामीण जत्रांतले देव राम व कृष्ण यांसारखे वा त्यांच्या अवतारांचे नसतात. या जत्रांतील ग्रामदैवते स्थलमाहात्म्यानुसार निर्माण झालेली असतात.

## ग्रामदैवतांचे महत्त्व

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत जितके स्थान राम, कृष्ण, बुद्ध यांचे आहे, तितकेच किंवा त्याहून अधिक या ग्रामदैवतांचे आहे. भैरवनाथ, जनाई, यमाई, तुकाई, काळूबाई, कानीफ-

नाथ, मारुती, रावणेश्वर, काळेश्वर, म्हसोबा, जोतिबा, खंडोबा, यल्लमा अशा अनेक देवदेवतांच्या वास्तव्याने ग्रामीण महाराष्ट्राचा देव्हारा गजबजलेला आहे. विठोबाच्या प्रेमाखातर तुकोबांसारख्यांनी या क्षेत्रदेवतांना व ग्रामदेवांना हीन लेखले असले तरी ते भक्तांच्या अघोरी व हिंसक करणीकडे पाहून. या ग्रामदेवांपैकी बहुतेक दैवते आर्येतर असल्यामुळे महाराष्ट्राच्या संस्कृतिसंवर्धनात आर्येतरांचा वाटा मोठा असल्याचे नवे मत मान्य करावयास हवे.

वृक्ष, प्राणी, जनावरे, श्रेष्ठ पूर्वज, हत्यारे इत्यादींना देव मानूनही अनेक ठिकाणी पूजाअर्चा सुरू झाली. देवदेवता आर्य की आर्येतर हा प्रश्न महत्त्वाचा नसून स्थानिक परिस्थितीनुसार ज्या दगडास शेंदूर फासला गेला, त्याच्यावर लोकांची श्रद्धा जडली. त्याच्याभोवती भावभावनांची पुटे चढत गेली. त्याला नवस होऊ लागले. त्याला प्रार्थना झाल्या. त्याला साकडे घातले गेले. तो गावचा रक्षणकर्ता बनला. त्या त्या परिस्थितीत त्या त्या लोकसमूहाचा तो खरा देवच. अशा अनेक देवांची व दैवतांची मोजदाद महाराष्ट्रापुरती तरी व्हावयास हवी. लोकसंस्कृतीचा आत्माच अशा पाहाणीत ध्यानात येण्यासारखा आहे. खंडोबा, जोतिबा, बहिरोबा, शितोबा, रवळनाथ, नागनाथ, रामनाथ, वाघदेव, डोंगरदेव, नागोबा, म्हसोबा, म्हस्कोबा, येडोबा, ढेगूमंगू, महामाया, मरीआई, जोखाई, कालिका, चंडिका, अंबा, यमाई, भवानी, वाघेश्वरी, सटवाई, टेंबलाई, जनाई, धानाई, जाखिणी, तुकाई, फिरंगाई, नवलाई, तामताई, सोनजाई, अंगलाई; अशा किती म्हणून देवांची नावे सांगावीत ? ज्याने त्याने आपल्या आवडीनुसार, श्रद्धेनुसार देव निर्माण केला, त्याच्या सामर्थ्यानुसार यात्रा-जत्रांचे व उत्सवाचे स्वरूप त्याने ठरवून टाकले.

महाराष्ट्रातील जत्रांचे व यात्रांचे निरीक्षण करताना एक महा त्त्वाची बाव ध्यानात येते. ती अशी की, ग्रामीण महाराष्ट्र हा शिवोपासकांचा आहे. राम आणि कृष्ण व त्यांचे अवतार यांची पूजा-गावोगावी आणि घरोघर होते. सण व उत्सवांच्या निमित्ताने या देवांची सतत आठवण होत असली तरी ऐतिहासिक दृष्टीने पाह-ताना शिवोपासकांची परंपरा जुनी आहे. व्याघ्रेश्वर, वाडेश्वर, कालेश्वर, सर्वेश्वर, वालुकेश्वर, कर्पादिकेश्वर, नर्मदेश्वर, विश्वे-श्वर, रामेश्वरसोमेश्वर अशा अनेक नावांनी महादेवाची मंदिरे अनेक गावांच्या नदीकाठी एकान्तवासात आजही उभी असलेली दिसतात. देवीची व शक्तीची उपासना महाराष्ट्रात निरनिराळ्या नावांनी प्राचीन काळापासून चालू आहे. पुणे, मुंबई, नासिक, कोल्हापूर इत्यादी शहरांचा आज उदय झाला असला तरी त्यांच्या विका-साच्या प्राथमिक अवस्थेत असणारी ग्रामदैवतेच प्रमुख होती आणि आजही त्यांचे माहात्म्य टिकून आहे.



शिवोपासकांच्या महाराष्ट्रात द्वादश ज्योतिर्लिंगांपैकी परळी वैजनाथ, भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर औंढचा नागनाथ व घृष्णेश्वर हीच पाच प्रमुख शिवस्थाने आहेत. शिवरात्रीस या स्थानांचे माहात्म्य चढतेवाढते असून, लक्षावधी लोक भाविकतेने या स्थानी येऊन शिवाचे दर्शन घेतात. याखेरीज गावोगाव महादेवाची देवळे असून त्यांचेही स्थानमाहात्म्य कमी नसते. अनेक देवळांच्या भोवती श्रावणातल्या सोमवारी यात्रा भरते. बेलफुलांचा सडा पडतो. 'हरहर शंकर' असा घोष होतो. अनेक ठिकाणी अनेक आख्यायिका शिवाच्या पिंडीविषयी, मंदिराविषयी ऐकू येतात. मुंबई व्ही. टी. स्टेशनपासून जवळच असलेल्या रे रोडवरील माणकेश्वराची यात्रा अशीच मोठ्या प्रमाणावर भरते. कोणास तरी दृष्टान्त झाला की, 'मी झाडाखाली जमिनीत आहे. मला वर काढावे.' त्याप्रमाणे जमीन खणण्यात आली. एक पिंडी निघाली. एक मंदिर उभे राहिले. श्रावणात कोजागिरी पौर्णिमेस व माही शिवरात्रीस माणकेश्वरासाठी मोठी यात्रा भरते. लघुरुद्राची आवर्तने होतात. महादेवाचा जयजयकार होतो. अंबरनाथ येथील अमरेश्वर किंवा अंबरेश्वराचे लिंग स्वयंभू म्हणून प्रसिद्ध आहे. या प्राचीन मंदिराची निर्मिती शिलाहार घराण्यातील राजा महामंडलेश्वराने सन ९८० च्या सुमारास केली असावी. प्राचीन शिल्पासाठी या मंदिराची ख्याती असून नंदीदरवाजा, गणपती दरवाजा, उत्तरदरवाजा अशी तीन मोठी प्रवेशद्वारे आहेत. याही स्थानाची यात्रा ठाणे जिल्ह्यात अतिशय प्रसिद्ध अशी आहे.

नाशिकजवळच्या त्र्यंबकेश्वराची ख्याती उभ्या भारतात आहे. निवृत्तिनाथांची समाधी व गोदावरीचा जवळच असलेला उगम, यांमुळे या स्थानाचे माहात्म्य नित्य वाढतच आहे. गौतम ऋषीने

या ठिकाणी तपश्चर्या केली होती. गंगाद्वार, ब्रह्मगिरी, गौतमकुंड, कुशावर्त अशा अनेक स्थानांच्या निर्मितिकथा पुराणांतून सापडतात. अनेक आख्यायिकाही निर्माण झाल्या आहेत. कोण्या महादेव कोळ्याची गाय घरी दूध न देता जंगलात एका विशिष्ट ठिकाणी आपल्या स्तनांतून दूध सोडते असे त्याने निरीक्षण केले.त्या ठिकाणी खणून पाहाता त्याला एक ज्योतिर्लिंग मिळाले; आणि त्याच निमित्ताने पहिल्या ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. परशुराम, श्रीपादवल्लभ, नृसिंहसरस्वती यांनी या ठिकाणी तपश्चर्या केल्याचा उल्लेख सापडतो. मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ, निवृत्तिनाथ यांची लीलाभूमी हीच असल्याचे सांगतात. प्रभू रामचंद्र वनवासात असताना आपल्या वडिलांचे श्राद्ध त्यांनी याच ठिकाणी केल्याची कथा आहे. अशा अनेक कारणांसाठी त्र्यंबकेश्वरास नेहमीच यात्रा भरते. श्रावणात महादेवावर लघुरुद्राचा वा महारुद्राचा अभिषेक होतो. महाशिवरात्रीस रुद्राभिषेक व महापूजा यांचा सोहळा होतो. कार्तिकी पौर्णिमेस रथाची मिरवणूक निघून दीपोत्सवाची शोभा वाढते. त्र्यंबकेश्वरच्या मुख्य मंदिराच्या बांधकामाची सुरुवात नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत सन १७५५ मध्ये झाली. एकतीस वर्षे बांधकाम चालले होते. याच स्थानाच्या परिसरात कृष्णमंदिर, गंगागोदामंदिर, लक्ष्मीनारायणमंदिर, राममंदिर, निवृत्तिनाथसमाधी अशी अनेक पवित्र स्थाने व कुशावर्ततीर्थ, गंगाद्वार, बिल्वतीर्थ, नीलगिरी, कनखलतीर्थ, बल्लाळतीर्थ, इंद्रतीर्थ, गंगासागर अशी अनेक पवित्र तीर्थे असल्यामुळे त्र्यंबकेश्वराचे महत्त्व वाढणारेच आहे. अधिक मास, सिंहस्थ अशा विशेष प्रसंगी हा परिसर भाविकांनी गजबजून जातो.

टोका येथील सिद्धेश्वर, लातूर येथील सिद्धेश्वर, अमरावती जिल्ह्यातील सालबार्डी येथील महादेव, जालन्याचा पंचमुखी महादेव; अशी अनेक जागृत शिवस्थाने महाराष्ट्रात आहेत. प्रत्येकाची यात्रा-जत्रा त्या त्या परिसरात प्रसिद्ध असून, प्रत्येकाविषयी काही कथा प्रचलित आहेत. टोका येथील सिद्धेश्वराचे हेमाडपंती देऊळ सन १७६१ मध्ये पेशव्यांच्या कारकीर्दीत पूर्ण झाले. नाना फडणिसांनी त्याची थोडीफार दुरुस्ती केली. दुर्गादेवी, मारुती, गणपती, दत्तात्रेय यांचीही मंदिरे या परिसरात आहेत. सातारा जिल्ह्यातील शंभू महादेवाचे देवस्थान इतिहासप्रसिद्ध असून तेथील यात्राही नावाजलेली आहे. हेही मंदिर हेमाडपंती थाटाचे असून याच्या परिसरात नागतीर्थ, पुष्कर्णीतीर्थ, गुप्तलिंग, एकलिंग, पानलिंग, महादेवलिंग, गौरीहर, उंबरदेव अशी अनेक पवित्र स्थाने आहेत. मालोजी भोसल्याने या स्थानावर एक मोठा तलाव बांधून पाण्याची गैरसोय दूर केली. म्हणून भोसल्यांच्या राजघराण्यास हे स्थान फार पवित्र वाटे. चैत्र शु. ५ पासून पौर्णिमेपर्यंत या शिखरावर यात्रेनिमित्ताने लाखो लोक जमतात. पंचमीच्या दिवशी देवाच्या अंगास हळद लावली जाते. अष्टमीच्या मध्यरात्री महादेवाच्या लग्नाचा समारंभ होऊन त्यास मोठमोठ्या देणग्या समर्पण होतात. पौर्णिमेस लक्ष्मीपूजा, प्रक्षाळपूजा होते. याशिवाय आषाढ, श्रावण, कार्तिक व माघी शिवरात्री, अशा निमित्तानेही येथे यात्रा भरत असते. प्रदर्शने, सर्कस, सिनेमा, पाळणे, मिठाईची दुकाने, इत्यादींनी सारा परिसर गजबजून जातो. अहल्याबाई होळकरांचा संबंध या देवस्थानाशी असल्यामुळे इंदूरपासूनचे भक्तलोक शिंगणापुरास येत असतात. संक्रांतीच्या सुमारास सोलापूर येथील सिद्धेश्वराची भरणारी जत्रा गड्डा जत्रा म्हणून प्रसिद्ध आहे. ‘ॐ नमः शिवाय’

चा जप करीत लक्षावधी भाविक सिद्धेश्वराचे दर्शन घेऊन तृप्त होतात.

परभणी जिल्ह्यातील औंढचा नागनाथ तर आणखी एक ज्योतिर्लिंग म्हणून प्रसिद्ध असल्याने त्याचीही महती विशेष आहे. दारुका नावाच्या एका दानव स्त्रीने गौरी पार्वतीची तपश्चर्या करून तिच्यापासून शक्ती मिळविली व ती अनेक देवांना त्रस्त करू लागली. दारुक दानवही ऋषींना व तपस्वी ब्राह्मणांना त्रास देत असे. या त्रासातून शिवाने सर्वांना सोडविले व या दारुकावनात भगवान शिव नागेशलिंगाच्या रूपाने वस्ती करून राहू लागला. नामदेवांकरिता नागनाथाचे देऊळ फिरले, अशीही कथा प्रसिद्ध आहे. बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ हे एक प्रसिद्ध ज्योतिर्लिंग असून या ठिकाणी मार्कंडेयाने सिद्धेश्वरलिंगाजवळ तपश्चर्या केली. वैजनाथ महादेवाने त्याचे तप पाहून त्याला दीर्घायुषी केल्याची कथा आहे. महाशिवरात्रीस येथे फार मोठी यात्रा भरते.

शिव अथवा महादेव यांची पत्नी पार्वती, दुर्गा, शक्ती, काली, चंडिका, कालिका, इत्यादी विविध नावांनी ओळखली जाते. देवीच्या उपासनेतही महाराष्ट्र फार प्राचीन कालापासून व्यग्र आहे. भवानीमाता ही शक्तीची उपासना असल्याने तुळजापूर, कोल्हापूर, सप्तशृंग, मातापूर, अमरावती, चंद्रपूर येथील देवींच्या यात्रांचे व जत्रांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. आश्विनाच्या पहिल्या नऊ-दहा दिवसांतील नवरात्राचे उत्सव अनेक ठिकाणी मोठ्या थाटाने साजरे केले जातात. मुंबईच्या महालक्ष्मीची प्रसिद्धी अवघ्या महाराष्ट्रात आहे. अठराव्या शतकात वरळीच्या समुद्रकाठचा रस्ता काही केल्या पूर्ण होऊ शकत नव्हता, त्यावेळच्या एका प्रभू ठेकेदारास दृष्टांत झाला. त्यानुसार समुद्रातील देवीच्या

मूर्ती काढून त्यांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यानंतर रस्ता नीटपणे तयार झाला. महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती या प्रेक्षणीय मूर्ती आज मुंबईकरांना अनेक कारणांसाठी वरदायिनी वाटतात. नाना प्रकारची उंची भरजरी वस्त्रे, नथ, कर्णफुले, पाटल्या, कमरपट्टा इत्यादींनी ही देवी नावाप्रमाणे महालक्ष्मीच वाटते. गुढीपाडवा, दसरा, दिवाळी, त्रिपुरी पौर्णिमा, अशा विशेष प्रसंगी या ठिकाणी फार मोठी यात्रा भरते. नाशिक जिल्ह्यातील सप्तशृंगी देवीची ख्याती अशीच विशेष आहे. चैत्र व आश्विन महिन्यांत या विस्तीर्ण पहाडावरही फार मोठी यात्रा भरते. लक्ष्मणाला शुद्धी यावी म्हणून मारुतीने द्रोणागिरीपर्वत खांद्यावर आणला. या प्रसंगी काही भाग गळून पडला,तो सप्तशृंगगड झाला, अशी कथा आहे. समुद्रसपाटीपासून ४६२९ फूट उंचीवर असलेले हे स्थान अतिशय रम्य व प्रेक्षणीय आहे. पहाडावर चढून गेल्यावरही पुन्हा ४७५ पायऱ्या चढाव्या लागतात. दगडी मंदिरात देवीची भव्य मूर्ती असून ती आठ फूट उंचीची आहे. तिच्या पायांखाली दानव चिरडला जात असून तिचे अठरा हात आयुधांनी सज्ज आहेत. ही देवी अनेकांची कुलस्वामिनी असल्यामुळे हिच्या दर्शनार्थ भक्तलोक सतत येत असतात.

तुळजापूरची भवानीमाता तर ब्राह्मण व मराठे यांची रक्षणकर्ती म्हणून प्रसिद्ध आहे. रामदासांनी फार चांगली भक्तिरसपूर्ण स्तोत्रे या भवानीची रचलेली असून पडत्या काळात हीच देवी शिवाजीसाठी प्रतापगडावर स्थिरावल्याची कथा आहे. कोल्हापूरची अंबाबाई व औंधाची यमाई अशीच त्या त्या भागात प्रसिद्ध असून अनेकांनी त्यांना आपल्या कुलस्वामिनीचे स्थान दिलेले आहे. मातापूर अथवा माहूर येथील रेणुकादेवी, मराठवाडा, विदर्भ व


तेलंगणच्या भागांत फार प्रसिद्ध असून चैत्र व आश्विन महिन्यांत तेथे गडावरही फार मोठी यात्रा भरते. माहुरगडाची तीन शिखरे प्रसिद्ध असून एकावर रेणुकामातेचे मंदिर आहे. दुसऱ्या शिखरावर गोसावीसंप्रदायातील दत्त आहे. तिसऱ्या शिखरावर अनसूयामातेचे मंदिर आहे. खाली गावालगत देवदेवेश्वर नावाचे दत्तस्थान महानुभावांच्या ताब्यात आहे. दत्तजयंतीसही माहूर येथील यात्रा फार मोठी असते. रेणूकेची मूर्ती भव्य असून अर्धाच छातीपर्यंतचा भाग आज दिसतो जमदग्नीबरोबर सती जाताना परशुरामाने हाक मारली म्हणून ही चितेतून अशी अर्धीच बाहेर आली, अशी कथा आहे. सर्वतीर्थ, मातृतीर्थ, अत्रिआश्रम, परशुराममंदिर, विष्णुकविमठ, अशी अनेक पवित्र स्थाने या परिसरात असल्यामुळे व आता पैनगंगेवर पूल वगैरे झाल्याने वाहतुकीची चांगली सोय झाली आहे. त्यामुळे माहूरचा परिसर नित्य गजबजून गेलेला असतो. जतची यल्लमा, कोल्हापूरची त्र्यंबोली (टेंबलाई), वाईजवळची मांढरदेवची काळुबाई, करमाळ्याची येडेश्वरी, आंब्याची जोगेश्वरी, अमरावतीची अंबादेवी, चंद्रपूरची काली, पुण्याची चतुःश्रृंगी, धुळे जिल्ह्यातील तळोद्याची कालिकादेवी, वणीची देवी, अशी अनेक देवीस्थाने महाराष्ट्रात असून त्यांच्या जत्रा-यात्रा त्या त्या भागांतून नावाजलेल्या आहेत.

परमेश्वरतत्त्व एक असले तरी त्याची अनेक रूपं आपण मानलेली असल्यामुळे नाना देव, नाना मंदिरे, नाना प्रकारचे यात्रा. उत्सव यांनी महाराष्ट्र गजबजून गेला आहे. नृसिंहवाडी, औदुंबर, सारगखेड, अक्कलकोट, शिर्डी अशी अनेक दत्तस्थाने जयंतीच्या निमित्ताने जागी होतात. लक्षावधी लोक दर्शनार्थ जमा होतात. कऱ्हाड, वाईसारख्या ठिकाणी कृष्णाबाईचे उत्सव उत्साहाने

साजरे होतात. जेजुरी, पाल, पेठ (नाशिक), मालेगाव (नांदेड); येथील खंडोबा, देऊळगावराजा, वाशिम येथील बालाजी, रत्नागिरीचा ज्योतिबा, नाशिक, जळगाव, श्रीरामपूर, नागपूर-जवळचे रामटेक, भोर, फलटण, येथील राम; आपल्या भक्त-गणांना एकत्र आणणारी ही देवदैवते आजही महाराष्ट्रात जागी आहेत. अनेक अवलिये व सूफी साधू यांचे दर्गे व अनेक चर्चेस यांच्या भोवतीही त्या त्या धर्मीयांचा मेळावा नेहमी भरत असतो.

महाराष्ट्रभूमी जशी शिवोपासकांची आहे, तशीच ती संतांचीही आहे. चांगदेव, मुक्ताबाई, निवृत्तिनाथ, सोपानदेव, कानीफनाथ, साईबाबा, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास, नामदेव, रेवण-सिद्ध, गोरोबा, कान्होपात्रा, दामाजी, सखाराम महाराज (लोणी), गाडगेमहाराज, घंटीबावा, लहानाजी महाराज, इत्यादी अनेक प्राचीन व अर्वाचीन सत्पुरुषांच्या पुण्यतिथींच्या निमित्ताने त्या त्या ठिकाणी यात्रा, जत्रा व महोत्सव यांची गर्दी नित्य चालू होते. पंढरपूर, आळंदी व देहू, ही तर अवघ्या महा-राष्ट्राची प्रसिद्ध तीर्थस्थाने-दैवतस्थाने. चैत्री, आषाढी, कार्तिकी एकादशीस येथे होणाऱ्या यात्रेचा सोहळा आता आंतरराष्ट्रीय महत्त्व मिळवीत आहे. चातुर्मास सुरू झाला की पंढरीस रोज यात्रेचे स्वरूप प्राप्त होते. 'जयजय राम कृष्ण हरी,' 'विठोबा रखुमाई', 'ज्ञानदेव- तुकाराम' अशा घोषांनी आकाश दुमदुमून जाते आणि या यात्रा-जत्रांच्या निमित्ताने माणसाच्या मनोगाभा-ऱ्यात सुप्तपणाने वास करणारा अणुरूप परमात्मा ब्रह्माण्डाप्रमाणे विराट होऊन चराचराशी एकरूप पावतो, अथवा चराचरात व्यापून राहिलेला विश्वात्माच आपल्या हृदयाच्या सिंहासनावर विराजमान आहे, अशी जाणीव अशा यात्राप्रसंगाने निर्माण झाली

व ती टिकून राहिली तरी या विपरीत काळान थोडके नाही. माणसामाणसातील प्रभुप्रेम एकमेकांच्या स्नेहभावास परिपुष्ट करू लागले तर अशा यात्रा-जत्रांचे मेळावे खचित उपकारक ठरतील. मतभेद न होता, उणेदुणे न काढता, नुसत्या मनरंजनासाठी जरी लोक देवाच्या नावावर जमले, एकत्र झाले तरी काही लहान कार्य-भाग नाही.




BVBK-0401982
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.